परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव।'

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष ९ • अंक ५ • डिसेंबर २०१५ / जानेवारी २०१६

मुखपृष्ठाविषयी

मुखपृष्ठावरील चित्रात साकार ब्रह्माबाबा व आकारी फरिश्ता ब्रह्माबाबा दर्शविण्यात आले आहेत. पिताश्री ब्रह्माबाबांनी साकार स्वरूपात सन १९३६ ते १९६९ अशी सुमारे ३३ वर्षे, साकार शरीराद्वारे भागीरथाचा (भाग्यशाली रथाचा) पार्ट बजावला. निराकार शिव परमात्म्याने त्यांच्या मुखकमलाद्वारे सत्य-गीता-ज्ञान व राजयोग शिकवला. मुख्य म्हणजे त्याग, तपस्या व सेवा यांच्या तीव्र पुरुषार्थाद्वारे पिताश्री ब्रह्माबाबांनी आपली संपूर्ण फरिश्ता स्थिती प्राप्त केली. १८ जानेवारी १९६९ रोजी त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व ते अव्यक्त वतनवासी फरिश्ता बनले. आजही ते आकारी फरिश्ता रूपाने विश्वातील सर्व ब्रह्मावत्सांची पालना करीत आहेत. सर्व मुलांना, सकाश (शक्ती) देत आहेत.

त्यामुळे आता अंतिम समयी प्रत्येक ब्रह्मावत्साचे हेच लक्ष्य असले पाहिजे की मला ब्रह्मा बापसमान फरिश्ता बनायचे आहे. शेवटी पिताश्री ब्रह्माबाबांना, त्यांच्या ४७ व्या दिव्य स्मृतिदिनानिमित्त सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम!

- प्रकाशक अमृतकुंभ



- **भागीरथ ब्रह्माबाबा** (संपादकीय) २
- **युग परिवर्तक पिताश्री ब्रह्मा बाबा** ५
- **रूहानी मेकअप** (आत्म्याचा शृंगार) ९
- **ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता** (भाग-९) ११
- **अमृतकुंभाची अलौकिक महिमा** (कविता) १४
- **सचित्र सेवावृत्त** १५
- **संगमयुगी ब्राह्मण जीवनाची अंतिम स्थिती-कर्मातीत** १९
- **विदेशात पसरत आहे आध्यात्मिक ज्ञानाचा प्रवास** २४
- **स्वउन्नतीमध्ये बाधक-आळस, बेपर्वाई व बहाणेबाजी** २७
- **शरीररूपी मंदिराला स्वच्छ ठेवा** ३०
- **पाच युगांचा पाळणा** (कविता) ३०
- **जसा संग तसा रंग** (अनुभव) ३१

फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता : संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३, • **वर्गणी पाठविण्याचा पत्ता** : बी.के.गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.
फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२ • E-mail :info@amrutkumbh.com.

डिमांड ड्राफ्ट 'अमृतकुंभ' या नावाने पाठवावा.

वार्षिक वर्गणी रु. ६०/– • अर्धवार्षिक वर्गणी रु. ३०/- • आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या www.amrutkumbh.com

(एप्रिल २०१६ ते मार्च २०१७ या कालावधीसाठी वार्षिक वर्गणी रु. ६५/- इतकी असेल.)

संपादकीय...

भागीरथ ब्रह्मा बाबा

ईश्वराच्या अस्तित्त्वाविषयी प्रत्येक धर्माच्या आपापल्या मान्यता आहेत त्याचप्रमाणे आदिदेव ब्रह्माविषयी देखील आपापल्या मान्यता आहेत. ब्रह्मदेवाद्वारे मनुष्य सृष्टीची स्थापना झाली असे हिंदू मानतात तर ख्रिश्चन बांधव व मुस्लिम बांधव 'ॲडम' व 'आदम' यांनी मनुष्य सृष्टीची स्थापना केली असे मानतात. जैन धर्माचे लोक ब्रह्मदेवाला 'आदिनाथ' मानतात. अलिकडच्या काही शतकात स्थापन झालेल्या विभिन्न धर्माचे बांधव परमात्म्याला मानतात. परंतु ही सृष्टी त्यांचा धर्म स्थापन होण्यापूर्वी निर्माण झाली असे मानतात. तात्पर्य म्हणजे विश्वाच्या निर्मितीसाठी परमात्म्याने ब्रह्मदेवाच्या माध्यमाचा आधार घेतला, हे सर्व शास्त्रात व पुराणात लिहिले आहे. तथापि त्या ब्रह्मदेवाचे आपल्या भारत भूमीमध्ये नव्हे; तर साऱ्या जगात एकच मंदिर आहे व ते आहे अजमेर येथे, हे मंदिर देखील हिंदू समाजातील बहुजनांना अज्ञातच आहे. वास्तविक प्रत्येक कल्पात कलियुगाचे अंती निराकार शिव परमात्मा नवविश्व स्थापनेच्या महान कार्यासाठी ज्या भागीरथ ब्रह्माबाबांचा आधार घेतात, त्यांचे ते यादगार मंदिर आहे. खरोखरच सर्व भाग्यवानांमध्ये भाग्यवान ब्रह्माबाबा आहेत म्हणूनच त्यांना भागीरथ (अर्थात भाग्यशाली रथ) असे संबोधले जाते. जसा परमात्मा एक निराकार आहे. तसाच त्यांचा भाग्यशाली रथ (शरीर) देखील एक आहे. या अनुषंगाने शिव परमात्म्याची ज्ञानमुरलीतील पुढील महावाक्ये अतिशय उद्‌बोधक आहेत. ''**मीठे बच्चे, भाग्यशाली रथ एक को ही कहा जाता है। यह तो मुकर्रर है ड्रामानुसार। बाप आकर ब्रह्मा मुखसे ज्ञान देते है, स्थापना का कार्य करते है। बलिहारी इस तन की है, जो इसमें बैठ तुम्हें पढाते है और तुम्हें हीरे जैसा बनाते है।**'' अशा या भागीरथ ब्रह्माबाबांचे जीवन चरित्र आपण थोडक्यात पाहू या.

ब्रह्माबाबांचा संक्षिप्त जीवन वृत्तांत

ब्रह्मा बाबांचे पूर्वाश्रमीचे नाव होते लेखराज खूबचंद कृपलानी. त्यांचा जन्म १८७६ साली सिंध प्रांतातील हैदराबाद येथे झाला. त्यांचे वडील गावातील एका शाळेचे मुख्याध्यापक होते. आई लहानपणीच वारली होती. त्यामुळे त्यांचे पालन-पोषण त्यांच्या वडिलांनीच केले. लेखराज अभ्यासात खूप हुशार होता. तसेच तो नारायणाचा अनन्य भक्त होता. रोज नियमित गीतेचे पठन करीत असे. पुढे दादा लेखराज आपली विशेष बौद्धिक प्रतिभा, व्यापारी कुशलता, व्यावहारिक शिष्टता, अथक परिश्रम, अचूक पारखण्याची कला इत्यादी गुणांमुळे एक प्रसिद्ध हिऱ्याचे व्यापारी बनले. दादांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रभावशाली व

विश्वाच्या निर्मितीसाठी परमात्म्याने ब्रह्मदेवाच्या माध्यमाचा आधार घेतला, हे सर्व शास्त्रात व पुराणात लिहिले आहे. तथापि त्या ब्रह्मदेवाचे आपल्या भारत भूमीमध्ये, नव्हे तर साऱ्या जगात एकच मंदिर आहे

आकर्षक होते. त्यांचे मुखमंडल दिव्य कांतीने दैदिप्यमान होते. ते उच्च कोटीचे साधक होते. त्यांनी ईश्वर प्राप्तीसाठी बारा गुरू केले होते. तथापि त्यांना ईश्वराची प्राप्ती झाली नव्हती.

पुढे सन १९३६ मध्ये दादा लेखराज जेव्हा ६० वर्षाचे झाले तेव्हा त्यांना शिव परमात्म्याकडून दिव्यदृष्टीचे वरदान प्राप्त झाले. त्यामुळे त्यांना अनेक दिव्य साक्षात्कार झाले. सर्वप्रथम त्यांना विष्णु चतुर्भुजचा साक्षात्कार झाला. त्यानंतर सृष्टीच्या महाभारी विनाशाचा साक्षात्कार झाला. तसेच सत्ययुगी सृष्टीच्या स्थापनेचा साक्षात्कार झाला. त्यामुळे त्यांच्यात बेहदचे वैराग्य उत्पन्न झाले. पुढे एक दिवस अचानक निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण त्यांच्या शरीरात झाले. शिव परमात्म्याने त्यांच्या मुखाद्वारे पुढील महावाक्य उच्चारण करून, स्वतःचा परिचय करून दिला-

निजानंद स्वरूपम्
शिवोऽहम् शिवोऽहम्
ज्ञान स्वरूपम्
शिवोऽहम् शिवोऽहम्
प्रकाश स्वरूपम्
शिवोऽहम् शिवोऽहम्

त्याचबरोबर शिव परमात्म्याने दादा लेखराज यांचे नाव 'प्रजापिता ब्रह्मा' असे ठेऊन, त्यांना नवीन सतोप्रधान दैवी सृष्टीच्या स्थापनेसाठी निमित्त बनवले. त्यानंतर ब्रह्माबाबांनी आपले सर्वस्व (तन, मन, धन, समय...) ईश्वरी कार्यासाठी समर्पित केले. त्यांचा त्याग दिव्य अलौकिक होता. त्यांनी आपली सर्व संपत्ती माता-कन्यांचा एक ट्रस्ट करून, त्यांच्या हवाली केली. (ते स्वतः त्या ट्रस्टमध्ये विश्वस्त म्हणून देखील राहिले नाहीत.) त्यातूनच 'ओम मंडली' ही संस्था स्थापन झाली व तिचेच नाव नंतर 'प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय' असे ठेवण्यात आले. आज या संस्थेची विश्वभरात १४२ देशातून ९००० पेक्षाही अधिक सेवाकेंद्रे मनुष्याला देवतातुल्य बनविण्याचे सर्वश्रेष्ठ कार्य करीत आहेत. याचेच प्रतीक म्हणून ब्रह्मादेवाच्या हातात शास्त्र दाखवितात तसेच त्यांनी दिलेले ज्ञान विश्वात चारही दिशांना पसरते म्हणून ब्रह्मदेवाला चार मुखे दर्शवितात.

सन १९३६ ते १९६९ या सुमारे ३३ वर्षाच्या कालावधीत प्रजापिता ब्रह्माबाबांनी तीव्र पुरुषार्थ केला. त्याग, तपस्या व सेवा यांच्याद्वारे आपली संपूर्ण कर्मातीत, फरिश्ता स्थिती प्राप्त केली. १८ जानेवारी १९६९ रोजी त्यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व ते अव्यक्त वतनवासी बनले. आजही ते अव्यक्त रूपाने विश्वसेवेचे महान कार्य करीत आहेत.

भगीरथाने नव्हे तर भागीरथ ब्रह्माबाबांनी (ज्ञान) गंगा आणली

भक्तिमार्गात गंगा ही भगीरथाने भूलोकी आणली अशी एक रोचक कथा आहे. त्यात सांगितले आहे की महाराज सगरचे ६० हजार पुत्र कपिलच्या क्रोधाग्निमुळे भस्मीभूत झाले होते. बऱ्याच कालावधीनंतर सगरच्या वंशात उत्पन्न, प्रसिद्ध सूर्यवंशी राजर्षी दिलीपचा पुत्र भगीरथाने गोकर्ण तीर्थावर अनेक वर्षे, कठोर तपस्या केली व ब्रह्माजींना प्रसन्न केले. त्याला वर देण्यासाठी ब्रह्माजी जेव्हा प्रकट झाले तेव्हा भगीरथाने सांगितले की 'माझे पूर्वज यावेळी कोणत्या दशेत आहेत, हे मला माहीत नाही. परंतु त्यांचा उद्धार करणे, हे माझे परम कर्तव्य आहे. आपण मला असे वरदान द्या की गंगा या भूलोकावर येऊन, आपल्या पावन जलाने माझ्या पूर्वजांचा उद्धार करेल.' त्यावर ब्रह्माजी म्हणाले की 'मी तर भूलोकावर गंगा पाठवून देईन; परंतु तिच्या प्रवाहाला थांबविण्याची शक्ती, दयासिंधु भगवान शिव यांच्यातच आहे. त्यामूळे तू त्यांची आराधना कर.'

ब्रह्माजीच्या आदेशानुसार भगीरथाने शिवाची आराधना केली. तसेच कठोर तपस्या केली. त्यामुळे परमात्मा शिव (शंकर) प्रकट झाले व ते कार्य करण्यासाठी तयार झाले. त्यांनी गंगेला आपल्या जटेत धारण केले. त्यानंतर ती भूलोकावरील प्राण्यांचा उद्धार करत-करत खालपर्यंत पोहचली व तेथे तिने भगीरथाच्या पूर्वजांचा उद्धार केला. या कथेवरून आपल्या लक्षात येईल की गंगा नदीला पतितपावनी समजणाऱ्या मनुष्यांची बुद्धी किती भ्रष्ट झाली आहे. त्यांना हे समजत नाही की पाणी हे मनुष्याला पावन कसे बनवेल? ही सर्व आहे भक्तिमार्गातील अंधश्रद्धा. आता आपण हे जाणतो की भगीरथाने नव्हे तर भागीरथ ब्रह्माबाबांनी ज्ञानगंगा भूलोकी आणली. व ही ज्ञानगंगा आज विश्वातील

दादांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रभावशाली व आकर्षक होते. त्यांचे मुखमंडल दिव्य कांतीने दैदिप्यमान होते. ते उच्च कोटीचे साधक होते. त्यांनी ईश्वर प्राप्तीसाठी बारा गुरू केले होते.

लाखो आत्म्यांना पावन बनवित आहे. या अनुषंगाने शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये अतिशय अर्थपूर्ण आहेत, **''मीठे बच्चे, प्रजापिता ब्रह्मा ही भाग्यशाली रथ है, जिसमें मैने प्रवेश किया है। भागीरथनेही ज्ञानसागर को लाया, जिससे तुम ज्ञान सुनते हो। इसलिए तुम्हारा नाम ज्ञान-गंगाये रखा है। बाकी वह पानी की गंगा-जमुना आदि तो सदैव है ही। सतयुग, त्रेता में भी है। यह है ज्ञान-गंगाओं की बात। मनुष्योंकी बुद्धी कितनी भ्रष्ट है। यह भी नही समझते की पानी कैसे पावन बनायेगा? यह सभी है भक्तिमार्ग की अंधश्रद्धा। बाप आकर इनसे निकालते है।''**

भागीरथ ब्रह्माबाबांचे प्रतीक नंदीगण

प्रत्येक शिव मंदिरात शिवलिंगासमोर नंदीगण दर्शविण्यात येतो. भक्तगण आधी मंदिरातील नंदीचे दर्शन घेतात. शिवाचे वाहन नंदीगण आहे, असे समजतात. आता विचार करा की निराकार शिव परमात्मा बैलावर बसून कसा येईल? राजयोग कसा शिकवील? आता आपण हे जाणतो की निराकार शिव परमात्मा, भागीरथ ब्रह्माबाबांच्या शरीराचा आधार घेऊन, आपल्याला राजयोग शिकवितात. आपल्याला श्रीमत देऊन श्री लक्ष्मी-नारायण, सूर्यवंशी राजा-राणी बनवितात. याविषयीची ज्ञानसागर शिव परमात्म्याची पुढील महावाक्ये सदैव लक्षात ठेवा, **''मीठे बच्चे, शास्त्रों मे तो बड़े-बड़े गपोडे लगा दिये है। बाप कहते है, मैं साधारण बूढे तन में आता हूँ। इस नन्दीगण में आकर प्रवेश करता हूँ। भागीरथ नन्दीगण को बैल दिखाया है। यह भाग्यशाली रथ है। नन्दीगण एक ही है।''**

तात्पर्य म्हणजे निराकार, परमपिता, शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या साकार माध्यमाद्वारे सत्य-गीता-ज्ञान प्रदान करून, तमोप्रधान आत्म्यांना सतोप्रधान बनवितो. फलस्वरूप सतोप्रधान सत्ययुगी सृष्टीची पुनर्स्थापना

होते. म्हणूनच शिव परमात्म्याबरोबर भागीरथ ब्रह्माबाबांनाही स्थापनेच्या निमित्त मानले जाते व शिवलिंगाबरोबर ब्रह्माचे प्रतीक रूप नंदीगणाची देखील मंदिरातून पुजा केली जाते.

ब्रह्माबाबांचा स्मृतिदिवस हा समर्थी दिवस

१८ जानेवारी २०१६ रोजी पिताश्री ब्रह्माबाबांचा ४७ वा दिव्य स्मृती दिवस अर्थात समर्थी दिवस आहे. पिताश्रींनी सन १९३६ ते १९६९ अशी ३३ वर्षे साकार शरीराद्वारे ब्रह्मावत्सांची पालना केली व १९६९ पासून पुढे अव्यक्त वतनवासी फरिश्ता बनून, आकारी शरीराद्वारे विश्वभरातील सर्व ब्रह्मावत्सांची पालना करीत आहेत. विश्वाच्या इतिहासात अशा प्रकारची श्रेष्ठतम फरिश्ता स्थिती प्राप्त करणारी ही एकमेव विभूती आहे. पिताश्री ब्रह्माबाबा हे नवविश्वाच्या स्थापनेसाठी निराकार परमात्म्याचे माध्यम असल्याने, ते कार्य संपन्न होईपर्यंत, अशीच अव्यक्त रूपाने सेवा करणार आहेत. पिताश्री हे सर्व आत्म्यांचे भाग्यविधाता आहेत. त्यांच्याद्वारेच संगमयुगात परमात्मा शिव पिता, सर्व आत्म्यांना सद्भाग्य वाटतात. अर्थात सद्भाग्य प्राप्तीसाठी ईश्वरी ज्ञान प्रदान करतात.आजही पिताश्री ब्रह्मा बाबांचा प्रत्येक संकल्प हा विश्व कल्याणासाठीच आहे. म्हणूनच गायन केले जाते की ब्रह्माच्या श्रेष्ठ संकल्पाने नव सृष्टीची स्थापना झाली.

पिताश्री ब्रह्माबाबांनी अंतिम समयी सर्व ब्रह्मावत्सांना एक विशेष वरदान दिले, **'सदा निराकारी, निर्विकारी, व निरहंकारी भव' या वरदानाचे स्वरूप बनण्यासाठी आपण आपली मन्सा सदा निराकारी, वाचा सदा निरहंकारी व कर्मणा सदा निर्विकारी ठेऊ या. वास्तविक हीच खरी पिताश्री ब्रह्मा बाबांना त्यांच्या ४७ व्या दिव्य स्मृतिदिनानिमित्त अर्पित श्रद्धांजली ठरेल.** ■■

निराकार, परमपिता, शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या साकार माध्यमाद्वारे सत्य-गीता-ज्ञान प्रदान करून, तमोप्रधान आत्म्यांना सतोप्रधान बनवितो. फलस्वरूप सतोप्रधान सत्ययुगी सृष्टीची पुनर्स्थापना होते.

युगपरिवर्तक पिताश्री ब्रह्माबाबा

- ब्र.कु. हेमंतभाई, शांतिवन, आबूरोड

कालचक्र सतत फिरत असते...सतत...न थांबता! स्वतःच्याच चालीने चालणारा व चालता चालता नेहमी बदलणारा काळ... कुणासाठी कधी थांबलाय का? कधीच नाही. दिवस-रात्र, आठवडा, महिना, वर्ष व युगांची ही यात्रा कल्पाच्या शेवटी सरते. कालचक्रा सोबत जीवनचक्रही परिवर्तनाच्या पाऊल वाटेने पुढे पुढे चालत राहते. परिवर्तन! होय... क्षणोक्षणी, पदोपदी होणारे परिवर्तन! समय व संसाराचा अटळ व आवश्यक नियम आहे परिवर्तन! सुखाचे दिन सरले की दुःखाच्या काळ रात्रीला सामोरे जावे लागते. सत्य-त्रेतायुगरूपी ब्रह्माचा दिवस मावळतो आणि द्वापार-कलियुगरूपी ब्रह्माची रात्र सुरू होते. परिवर्तन कोठे नाही? इतिहास साक्षी आहे वैश्विक परिवर्तनाचा. जेव्हा जेव्हा काम क्रोधादी मनोविकारांचा गुलाम बनून मानव दानव बनतो, स्वार्थापोटी आंधळा झालेला मानव समाज आपापसात रक्तरंजित युद्धे करतो. विश्व विनाशाच्या उंबरठ्यावर उभे ठाकते, तेव्हा कोणीतरी परिवर्तन करणारा प्रणेता उदयास येतो.

असाच काळ होता तो.... भयक्रांत करणारा. सारे विश्व पहिल्या महायुद्धाच्या भयानक आगीत होरपळून निघाले होते.



जातीभेद, रंगभेद, वर्णभेदाच्या भिंती विश्व समाजाला खंडित करीत होत्या. जुनाट रूढी मान्यता व परंपरांना पूर आला होता. भारतभूमीचे परकीय आक्रमकांनी तुकडे केले होते. विश्वगुरू बनून ज्ञानाचा प्रकाश देणारा भारत अज्ञान अंधःकारात बुडाला होता. नास्तिकता विकोपाला पोहचली होती. मानव-धर्म छिन्नभिन्न झाला होता व धर्माच्या नावावर लढाया होत होत्या. सर्वत्र दुःखाचा महासागर उसळत होता. घोर धर्म ग्लानीचीच वेला होती ती. अज्ञान, अंधश्रद्धा व अत्याचाराची

गीतेत दिलेल्या वचनानुसार आत्म्यांची पुकार ऐकून सन १९३६ मध्ये निराकार परमात्मा धरतीवर धावून आला आणि अधर्माचा नाश व सत्धर्माच्या स्थापनेसाठी मानवी देहाचा आधार घेतला. विश्व परिवर्तनाच्या कार्यासाठी ईश्वराने आपले माध्यम बनविले त्या महामानवाचे नाव होते दादा लेखराज.

महाभयंकर काळ रात्रच होती. पण कोण करेल त्या काळ रात्रीचा अंत? कोण करेल त्या सत्य धर्माची पुनःस्थापना? कोण करेल कलियुगाचा कायापालट? कोण उचलेल परिवर्तनाचा विडा?

साऱ्या जगाचे डोळे त्या तारणहार ईश्वराकडे लागले होते. **गीतेत दिलेल्या वचनानुसार आत्म्यांची पुकार ऐकून सन १९३६ मध्ये निराकार परमात्मा धरतीवर धावून आला आणि अधर्माचा नाश व सत्धर्माच्या स्थापनेसाठी मानवी देहाचा आधार घेतला.** विश्व परिवर्तनाच्या कार्यासाठी ईश्वराने आपले माध्यम बनविले त्या महामानवाचे नाव होते दादा लेखराज. परमात्म्याचे प्रगाढ प्रेमी, नारायणाचे परमभक्त, धर्मपरायण, नारीशक्ती उद्धारक, मानवतेचे पुजारी व गोर-गरिबांचे कैवारी... समाजात भरपूर मान-सन्मान, चारचौघात चांगले वजन, सोने-चांदी हिऱ्या-मोत्यांचा सिद्धहस्त सफल व्यापार, तत्कालीन राजेरजवाड्यांशीही घनिष्ठ संबंध संपर्क, राजांनाही लाजवेल अशी कुलीन शाही प्रतिष्ठा, उज्ज्वल चारित्र्याने संपन्न व्यक्तिमत्त्व होते भव्य आणि दिव्य, बहुमुखी प्रतिभा संपन्न दादा लेखराज यांचे.

नवसृष्टीच्या निर्मितीसाठी अशा महापुरुषाला परमात्म्याने कर्तव्यवाचक नाव दिले ''प्रजापिता ब्रह्मा'' ईश्वर भक्तिची पराकाष्ठा, हृदय मंदिरात तेवत राहणारी मानव सेवेची ज्योति, निःस्वार्थ प्रेमाची उधळण करणारे मायाळू-कृपाळू उदार अंतःकरण, मानवमात्रच नाही तर पशु, पक्षी, प्राणी व प्रकृतीवरही जीवापाड प्रेम लुटणारे साक्षात प्रेमाचे मूर्तिमंत दिव्य रूप.

''जे का रंजले गांजले।
त्यासी म्हणे जो आपुले।।
तोचि साधु ओळखावा।
देव तेथेचि जाणावा।।''

ह्या उक्तीला पुरुन उरलेलं दया-करुणा व क्षमेचं साकार रूप. पारब्रह्म परमेश्वर, ज्ञान सागराला घोर तपस्येने शरीररूपी रथात आरुढ करणारे भागीरथ. ईश्वरावर अटूट निश्चय, दृढ विश्वास, अगाध श्रद्धा. विपरीत परिस्थितींवर मात करण्याची अफाट इच्छा शक्ती अशा कितीतरी नानाविध गुणांच्या छटा होत्या ब्रह्माबाबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या. म्हणूनच पिताश्री ब्रह्माबाबा हे परमात्म कार्याला भूलोकी साकार मूर्तरूप देणारे योग्य, उपयुक्त व उत्तमोत्तम माध्यम सिद्ध झाले.

ब्रह्माबाबांनी दूरदृष्टीने पाऊले उचलत युग परिवर्तनाचा शंखनाद केला. अज्ञानाच्या काळ्याकुट्ट काळरात्रीचा व कलह कालाचा कायापालट केला. रुढीवादी समाजाला अंधश्रद्धा व अज्ञानाच्या अंधःकारापासून मुक्त करून नवी दिशा दिली. सुखमय संसाराचा पाया रचला व विकाराने त्रस्त झालेल्या दुःखी संसाराची दशा बदलली. त्यासाठी मातृशक्तीचे मोल जाणून, मातृशक्तिस सस्नेह सन्मान देऊन, तिच्यातील सूप्त शक्ती जागृत करून माता-भगिनींना ईश्वरीय कार्यासाठी निमित्त केले. ओम राधेस प्रमुख बनवून माता व कन्यांची सशक्त शिवशक्ती सेना उभी केली. जीर्ण झालेल्या, दुःखदाई समाजरूपी इमारतीचा जीर्णोद्धार करण्याचा शुभ संकल्प केला.

मूल्यनिष्ठ समाजाच्या सुंदर सुखदाई वास्तूच्या नवनिर्मितीसाठी बालमनाला निवडले. ज्याप्रमाणे मृदुमातीला मनासारखा सुंदर आकार देता येतो. त्याचप्रमाणे आदर्श समाजाच्या रचनेसाठी पाहिजे तसा आकार देता येईल अशा बालक-बालिकांची निवड केली. त्यांची बोर्डिंग उघडून मृदू मनाला हवा तो आकार व दैवी संस्कार देण्यासाठी शाळाही सुरू केली. स्त्रीला प्रथम गुरुचा मान देऊन, बालमनाला आकार देण्यासाठी निमित्त बनविले. तिच्याद्वारे कोमल बालमनांना आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रकाशाचा स्पर्श दिला. शिक्षणासोबत सुसंस्कार दिले. दिव्यगुणधारी बालगोपालांची ती पलटण जणू स्वर्णिमयुगाच्या स्थापनेची नांदीच होती.

तांबडं फुटू लागलं की सूर्योदयाची चाहूल लागते. त्याचप्रमाणे नैराश्याच्या अंधारात ब्रह्मा बाबांच्या प्रयत्नांची पराकाष्ठा विश्व क्षितिजावर युगपरिवर्तनाच्या सूर्योदयाची चाहूल देत होती. परंतु हे ही त्रिकाल सत्य आहे की जेव्हा समयानुसार समाजाला परिवर्तनाचा आभास झाला, तेव्हा भ्रमित समाजाने त्या परिवर्तनाचा जोरदार विरोध ही केला. ओम मंडळीला अशाच प्रकारे कुत्सित समाजाच्या जीवघेण्या विरोधाला सामोरे

स्त्रीला प्रथम गुरुचा मान देऊन, बालमनाला आकार देण्यासाठी निमित्त बनविले. तिच्या द्वारे कोमल बालमनांना आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रकाशाचा स्पर्श दिला. शिक्षणासोबत सुसंस्कार दिले. दिव्यगुणधारी बालगोपालांची ती पलटण जणू स्वर्णिमयुगाच्या स्थापनेची नांदीच होती.

जावे लागले. माता-बहिणींनाच नव्हे तर चिमुरड्या बाल-बालिकांनाही अंधविश्वासू कट्टर धर्मावलंबी व कठोर नातेवाईकांची जोरजबरदस्ती, मारहाण सारं काही सहन करावे लागले.

ब्रह्माबाबांचा समाजात जो मान मर्तबा होता, प्रतिष्ठा होती त्यावर बदनामीचे काळे डागही लागले. समाज कंटकांनी पिताश्रीचे प्राण घेण्याचा प्रयत्न ही केला. परंतु पिताश्रींनी हार मानली नाही. ब्रह्माबाबांच्या हिमालयासम दृढ-इच्छाशक्तीसमोर विकृत मानसिकतेच्या समाजाला अखेर नतमस्तक व्हावेच लागले. सिंध हैद्राबाद येथे स्थापन झालेली ओममंडळी कराची येथे स्थानांतरीत झाली. चौदा वर्षात बालगोपाल माता-भगिनींचे संघटन राजयोग साधनेने खऱ्या सोन्यासम तावून सुलाखून निघाले. ज्ञानामृताचे नित्य पान करून सशक्त झालेली शिवशक्ती सेना, विकारी रावण राज्याची पाळेमुळे उपटून काढण्यासाठी सुसज्ज बनली. परमात्म अवतरणाबरोबर भारत भूमी परकियांच्या गुलामीतून मुक्त झाली होती. ईश्वरी आज्ञेनुसार सन १९५० मध्ये ब्रह्मावत्सासोबत ब्रह्माबाबांनी आबू पर्वतावर प्रस्थान केले.

स्त्रीच्या सन्मानाचे महत्त्व ब्रह्माबाबांनी परमात्म्याच्या प्रवेशतेच्या आधीच जाणले होते. म्हणूनच एकदा जेव्हा चित्रकाराने नारायणाचे पाय दाबणाऱ्या लक्ष्मीचे चित्र काढले, ते बाबांना उचित वाटले नाही, म्हणून बाबांनी चित्रकारांस श्री लक्ष्मीस आदरसहित श्री नारायणाच्या सोबत दाखविण्याचा आदेश दिला. ब्रह्मा बाबांनी श्रीकृष्ण व श्रीरामाच्या जीवन चरित्रात वर्णिलेल्या राधिका, गोपिका, सीता, शबरी, अहिल्यासम नारीहृदयाच्या कोमल भावना ओळखल्या. तिच्या व्यथा, वेदना जाणल्या. कधी प्राणसखा-पाठीराखा बनून मदतीला धावले, तर कधी पुत्र व मित्र बनून मातृहृदयाचे मनोरंजन केले. अशिक्षित, आश्रित मातांना चाकोरीबद्ध जीवनातून बाहेर काढले. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः' ही स्वर्णिम सत्ययुगी भारताची, देवभूमीची गाथा साकार केली.

पायातली पादत्राण (वहाण) समजल्या जाणाऱ्या नारीचे पाय धुतले, पुजले व प्रेम दिले. जयंति बहेनजींनी सांगितलेली, मातृउद्धारक ब्रह्माबाबांच्या उदारतेचे दर्शन करविणारी ही एक सत्य घटना आहे. पुण्याहून जयंति बहेनजींच्या आजी व अन्य मातांचा ग्रुप बाबांना भेटण्यासाठी मधुबनला निघाला होता. तेव्हा दळणवळणाची साधने नव्हती. आबूरोड ते आबूपर्वत हा प्रवास खूपच अवघड होता. **बाबांना जेव्हा मातांच्या आगमनाची सूचना मिळाली, बाबांच्या हृदयातील वात्सल्य, प्रेम ओथंबून आले. थंडीचे दिवस होते. संध्याकाळ झाली होती. बाबांनी लच्छू दादींना पाणी गरम करण्यास सांगितले. माता पोहोचल्या व बाबांनी प्रत्येक मातेचे पाय स्वतः च्या हातांनी धुतले. ज्या नारीचे तोंड पाहणे हे पातक समजले जात असे; तिच्या चरणांची ही पुजाच नव्हे काय?**

'ज्याचा जगी कोणी नाही, त्याचा देवच वाली असतो' हे सत्य बाबांच्या आचरणात सदैव दिसे. ओम मंडळींच्या आरंभी एक विधवा माता येत होती. तिला काहीही लिहिता-वाचता येत नव्हते. मात्र तिचे बाबांवर अंतःकरणापासून प्रेम होते. बाबांच्या प्रत्येक व्यक्तिगत सुखसुविधांची व साधनांची ती काळजी घेई. बाबांची रूम, बिछाना, कपडे इत्यादीची मनः पूर्वक देखभाल करीत असे. सर्वात पुढे बसून ज्ञानमुरली ऐकण्यात मग्न होई. तिच्या निरागस स्नेहावर बाबांची प्रीती अवर्णनीय अशी होती. तिच्या त्या प्रेमाचे ऋण ब्रह्माबाबांनी अखेरपर्यंत फेडले. आबूपर्वतावर आल्यावर जेव्हा ती गोपिका आजारी पडली तेव्हा बाबांनी आई बनून तिची लहान बाळाप्रमाणे सेवा केली. ती अंथरुणावर पडल्यावर तिचे लघवीचे पात्र ही स्वतः उचलले. तिला देहत्यागानंतर खांदा देऊन तिच्या चितेला बाबांनी मुखाग्निही दिला.

पैशापेक्षा प्रेमाला महत्त्व देणारे बाबा गरिबांचा पैसा न पैसा स्वर्ग स्थापनेत सफल करीत. बाबांच्या प्रेमात रंगलेली अशीच एक गंगा माता पुण्यात राहात असे त्यावेळेस छोटा हॉल (हिस्ट्री हॉल) बांधला जात होता. गंगा माताकडे हरभऱ्याच्या दाण्याएवढ्या मंगळसूत्राच्या दोन वाट्या होत्या. त्या विकून मिळालेले आठ रुपये मातेने बाबांकडे पाठविले. लखोपती करोडपतीने पाठविलेल्या लाख

ज्ञानामृताचे नित्य पान करून सशक्त झालेली शिवशक्ती सेना, विकारी रावण राज्याची पाळेमुळे उपटून काढण्यसाठी सुसज्ज बनली. परमात्म अवतरणाबरोबर भारत भूमी परकीयांच्या गुलामीतून मुक्त झाली होती.

परिवर्तनासाठी कुणीही हीन दुर्बल नारीस निवडले नाही. मात्र ब्रह्मा बाबांनी शांतीच्या क्रांतीसाठी स्त्रीला निवडले. नर्काचे द्वार समजल्या जाणाऱ्या नारीला स्वर्गाचे द्वार उघडण्यासाठी निमित्त बनविले. तिच्यात असलेली सहनशीलता, संस्कारशीलता व संगोपन-कला इत्यादीचा पुरेपूर सदुपयोग केला.

करोड पेक्षा बाबांना त्या गरीब मातेची आठ रुपयाची संपत्ती कितीतरी मूल्यवान वाटली. जेव्हा-जेव्हा पुण्याहून दादी जानकीजी मधुबनला येत, तेव्हा-तेव्हा गंगा माताची बाबा मनापासून आठवण करीत. येवढंच नव्हे तर बाबांच्या नेत्रात प्रेमाचे अश्रू मोती बनून झरझर पाझरू लागत. **त्या मातेचा अंतदेखील अतिशय अद्‌भुतरितीने झाला. एकदा ज्ञान मुरली संपल्यानंतर दादी जानकींनी यादप्यार व नमस्ते असे म्हटले. गंगा मातानेही बाबांना नमस्कार केला व बसल्या जागीच देह सोडला. जणू प्रेमाची गंगा प्रेमसागराला मिळाली.**

वेळोवेळी विश्वात परिवर्तनासाठी क्रांत्या झाल्या. पण त्या परिवर्तनासाठी कुणीही हीन दुर्बल नारीस निवडले नाही. मात्र ब्रह्मा बाबांनी शांतीच्या क्रांतीसाठी स्त्रीला निवडले. नर्काचे द्वार समजल्या जाणाऱ्या नारीला स्वर्गाचे द्वार उघडण्यासाठी निमित्त बनविले. तिच्यात असलेली सहनशीलता, संस्कारशीलता व संगोपन-कला इत्यादीचा पुरेपूर सदुपयोग केला. ''चूल आणि मूल'' ह्या मोह मायेच्या भावबंधनात गुरफटलेल्या मातांना मुक्त केले. घराच्या उंबरठ्यापासून विश्वाच्या वेशीपर्यंत पोहोचवले व सेवेच्या आकाशात उंच भरारी दिली. **ज्ञान गंगा बनवून पतितांना पावन करण्यासाठी पाठविले. ह्याचे मुर्तिमंत उदाहरण आहेत. ब्रह्माकुमारीज्‌च्या प्रमुख प्रशासिका राजयोगिनी दादी जानकीजी. आज त्या विश्वाच्या आध्यात्मिक गुरु बनून, धर्मसत्ता, राजसत्ता, विज्ञानसत्ता यांना मार्गदर्शन करीत आहेत. हे एक महान परिवर्तनच नव्हे काय?**

आजवर राजसत्ता, धर्मसत्ता, व विज्ञानसत्ता यांनी विश्वाचे पतन थांबविण्यासाठी भरपूर प्रयत्न केले; परंतु श्रेष्ठाचाराऐवजी भ्रष्टाचारात भरकटलेली राजसत्ता, बुवाबाजी-भोंदूगिरी-फसवेगिरीने कलंकित झालेली धर्मसत्ता व विनाशाची साधने निर्माण करणारी विज्ञानसत्ता; विश्वाला नवे रूप कसे देऊ शकेल बरं? ह्या दुष्कर, असाध्य कार्याची पूर्ती फक्त परमात्म्याची परमसत्ताच करू जाणे. निराकार परमात्म्याने नवविश्व निर्माणासाठी ब्रह्माबाबांना माध्यम बनविले. तेव्हापासून नारीचे सर्वत्र उत्थान होत आहे. प्रत्येक क्षेत्रात महिलांना प्राधान्य मिळत आहे. आध्यात्मिक ज्ञान व राजयोगाच्या अभ्यासाने खऱ्या अर्थाने स्त्रीसशक्तीकरण होत आहे. असे म्हटले जाते की, ब्रिटिशांच्या शासनकालात कधीच सूर्यास्त होत नसे. (कारण इंग्रजांचे राज्य पृथ्वीवर सर्वत्र होते.) आजही पृथ्वीच्या पाठीवर पाचही खंडात हजारो राजयोग सेवाकेंद्रे ज्ञानसूर्याचा प्रकाश पसरवित आहेत. परिणामतः घोर अज्ञानाच्या कलह-क्लेशयुक्त कलियुगाचा अंत होत आहे.

माता 'बहिर्णीद्वारे' चालविली जाणारी ब्रह्माकुमारीज् ही विश्वातील एकमेव संस्था होय, जी विज्ञानाला सोबत घेऊन साऱ्या जगास अध्यात्माचा महिमा सांगत आहे. सायन्स सोबत साइलेन्स पॉवरची महत्ता सिद्ध करीत आहे. अनेक भोगवादी पाश्चिमात्य देश ब्रह्माकुमारीज् द्वारे शिकविला जाणारा राजयोग आवडीने शिकत आहेत. माता बहिणी भारत मातेस पुन्हा विश्वगुरू बनवीत आहेत. यु.एन.ओ. (युनायटेड नेशन्स) संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये ब्रह्माकुमारी भगिनींना संयुक्त सल्लागाराचे पद प्राप्त आहे. संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे विश्व शांतीसाठी केल्या जाणाऱ्या प्रत्येक कार्यात ब्रह्माकुमारीज्‌चा सिंहाचा वाटा असतो. संयुक्त राष्ट्रसंघाने विश्वशांतीच्या कार्यासाठी राजयोगिनी डॉ. दादी प्रकाशमणिजींना ''शांतिदूताचा'' पुरस्कारही प्रदान केला आहे.

निराकार शिव परमात्म्याचे कार्य ब्रह्माबाबांनी माध्यम बनवून सहज सुलभच केले नाही तर खरोखरीच युग बदलले. आधुनिकतेसोबत आध्यात्मिक ज्ञानाचे युग आले. अशा युगपरिवर्तक, नारीशक्ती उद्धारक, नवविश्व सृजक ब्रह्माबाबांना यांच्या या थोर कार्यासाठी आमुचे शतशत नमन. **बाबांच्या या युगपरिवर्तनाच्या कार्यात स्वपरिवर्तनाचा शुभसंकल्प करून सहयोग देणे, हीच पिताश्रींच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अर्पित केलेली खरी श्रद्धांजली ठरेल. म्हणून चला तर स्व-परिवर्तनाने अवघ्या विश्वाचे परिवर्तन करूया व ब्रह्माबाबांनी शुभारंभ केलेल्या युग-परिवर्तनाच्या कार्याची पूर्णता करुया!**

■■

रूहानी मेकअप

(आत्म्याचा शृंगार)

- ब्र.कु. मुग्धा तांबे, नाशिक

आजच्या युगात बाह्य सौंदर्याला अतिशय महत्त्व आहे. व्यक्ती गुणांनी कशीही असली तरी ती दिसायला सुंदर असेल तर तिच्या अवगुणांकडे दुर्लक्ष केले जाते. म्हणतात ना पॅकींग (रॅपर) आकर्षक असले तर आतल्या वस्तूकडे किंवा तिच्या गुणवत्तेकडे फारसे बघितले जात नाही. मानवी सौंदर्याबाबतही हेच सत्य ठरत आहे. म्हणूनच तर आज गल्लीबोळात ब्युटी पार्लरची संख्या वाढते आहे. वर्तमानपत्रे किंवा प्रसार माध्यमांद्वारे गोरेपणा देणारी, वय लपविणारी, त्वचा पुनर्जीवित करणारी अनेक क्रीम, लोशन, साबण इत्यादींच्या जाहिरातींचा मारा होत असतो. निश्चितच या सर्व गोष्टींमुळे बाह्य सौंदर्य कितपत सुधारते ते सांगणे कठीण आहे. वरील उत्पादनांच्या जोडीला शक्तिवर्धक, आरोग्यवर्धक औषधांचे प्रमाणही खूप मोठे आहे. विविध सौंदर्यतज्ञ किंवा डॉक्टर योग्य आहार, योग्य विहार वा योग्य व्यायामासाठी मार्गदर्शन करत असतात. कारण त्याद्वारे आरोग्य सुधारून त्याचा फायदा बाह्य सौंदर्याला होतो.

विविध ठिकाणचे जॉगींग ट्रॅक्स, मोकळ्या हवेत फिरण्याचे फायदे, झुंबा, एरोबिक्स सारख्या नृत्य प्रकारांद्वारे शिकवला जाणारा व्यायाम, विशिष्ट दिवसाचे औचित्य साधून आयोजित केल्या जाणाऱ्या मॅरेथॉन सारख्या स्पर्धा या सर्व गोष्टी मानवी शरीराला सुदृढ व निरोगी बनविण्याचा प्रयत्न करतात. वरील उपक्रम स्तुत्य आहेत. **एकंदरीत येथे केवळ शरीराचा विचार केला जातो. या शरीरात निवास करणारी, त्याला जीवन देणारी जी चैतन्य शक्ती आत्मा आहे; तिच्या सौंदर्याचा विचार करण्याची खरी आवश्यकता निर्माण झाली आहे.**

मेकअप करून कृत्रिम सौंदर्याचा आभास निर्माण केला जातो. चेहऱ्याच्या मेकअपसाठी सर्व प्रथम मॉईश्चरायझर लावून त्यावर बेस अथवा फाउंडेशन लावले जाते. त्यानंतर पावडर, रूज, आय बेस, आय लायनर, आय शॅडो तसेच लिपस्टीक व लिप लायनर लावतात. या सर्व गोष्टींमुळे चेहऱ्यावर असलेले काळे डाग, काळी वर्तुळे तसेच इतर दोष झाकले जातात व चेहरा सुंदर दिसू लागतो. भारतीय संस्कृतीप्रमाणे सर्वात शेवटी (कुंकू) टिकली लावली जाते. (मी ब्यूटिशियन नसल्याने यात काही चूक असल्यास क्षमा करावी.) ढोबळ मानाने हा क्रम लिहिलेला आहे. अशा रितीने केलेल्या मेकअपमुळे व्यक्तिमत्त्व वा चेहरा अल्पकाळाकरिता परिवर्तीत होतो. एकदा मेकअप करून झाल्यावर तो खराब न होण्याची काळजी घ्यावी लागते. घाम, धूळ, पाणी इत्यादी अनेक कारणांनी तो खराब होऊ शकतो. हल्ली वॉटरप्रूफ मेकअप केला जातो. **या सर्व पार्श्वभूमीवर परमप्रिय शिवबाबांनी दिलेले दि. १६ ऑक्टोबर २०१५ च्या मुरलीतील ''रूहानियत के प्रभाव द्वारा फरिश्तेपन का मेकअप करनेवाले सर्व के स्नेही भव'' हे वरदान खूपच अंतर्मुख करणारे आहे.**

रूहानी मेकअप (आत्म्याचा शृंगार) करताना प्रभू प्रेमाचे मॉईश्चरायझर लावावे

व्यक्ती गुणांनी कशीही असली तरी ती दिसायला सुंदर असेल तर तिच्या अवगुणांकडे दुर्लक्ष केले जाते. म्हणतात ना पॅकींग (रॅपर) आकर्षक असले तर आतल्या वस्तूकडे किंवा तिच्या गुणवत्तेकडे फारसे बघितले जात नाही.

आत्मा आपल्या सद्‌गुणांचा सुगंध सर्वत्र पसरवतो. ईश्वरी संगाचा रंग अर्थात लाली लावल्याने आत्म्याच्या आरोग्याची झलक दिसून येते. पुढे येतो डोळ्यांचा मेकअप. आयबेस व आयशॅडो आपल्यात सकारात्मक दृष्टिकोन जागृत करतात.

लागते. त्यावर ईश्वरी ज्ञानाचा बेस असतो. ईश्वरी ज्ञान पुढील सर्व मेकअपचा पाया आहे. या ज्ञानाच्या धारणेने आत्मा आपल्यातील अवगुण, कमतरता, कमजोरी केवळ लपवत नाही, तर नष्ट करत असतो. एकदा ज्ञान धारण झाले की, गुणांच्या रूपात पावडर लावण्याची सुरुवात होते. आत्मा आपल्या सद्‌गुणांचा सुगंध सर्वत्र पसरवतो. ईश्वरी संगाचा रंग अर्थात लाली लावल्याने आत्म्याच्या आरोग्याची झलक दिसून येते. पुढे येतो डोळ्यांचा मेकअप. आयबेस व आयशॅडो आपल्यात सकारात्मक दृष्टिकोन जागृत करतात. प्रत्येकाकडे पाहाण्याची दृष्टी रूहानी (आत्मिक) होते. मर्यादारूपी आयलायनर कोणत्याही वाईट गोष्टी, इतरांमधील अवगुण अथवा विकारी गोष्टी न बघण्याची मर्यादा घालून देतो. त्यामुळे दृष्टीचे सौंदर्य वृद्धिंगत होते.

डोळ्यांप्रमाणेच महत्त्वाचे दुसरे इंद्रिय म्हणजे मुख. ओठ म्हणजे मुखाची मर्यादा. त्यांना विविध रंगांच्या लिपस्टिकने सजवतात. अर्थातच मुखातून सदैव ज्ञान रत्न निघतात. इतरांसाठी शुभभावना, शुभकामनाच व्यक्त होतात. लिपलायनर लावून गोड बोला, हळू बोला, कमी बोला, शुभ बोला अशा वेगवेगळ्या गोष्टींची सवय लावली जाते.

सर्व मेकअपचा कळस म्हणजे बिंदी (कुंकू) लावणे. अर्थात या साऱ्या गोष्टींसाठी आवश्यक आहे आत्मिक स्मृतीची जाणीव होणे. इतक्या सुंदर मेकअपला जपावे देखील लागते आणि वारंवार तो नीटनेटका करावा लागतो. त्यासाठी रोज ईश्वरी महावाक्यांची उजळणी करावी लागते आणि 'मेकअपमन' म्हणजेच 'शिवबाबांशी' सततचा संपर्क (योग) साधावा लागतो; म्हणूनच शिवबाबा मुरलीतून कधी-कधी सेवाकेंद्राला 'रूहानी ब्यूटी पार्लर' असेही म्हणतात.

या रूहानी मेकअपला मायेच्या वेगवेगळ्या रूपांपासून जपावे लागते, जेणेकरून तो खराब होणार नाही. व्यर्थ पाहाणे, बोलणे तसेच ऐकणे या गोष्टी हा मेकअप खराब करू शकतात. अवगुणरूपी धूळ मधून-मधून साफ करावी लागते. दुःख, अशांती या सर्व गोष्टी देखील मेकअप बिघडवू शकतात. स्थूल वॉटरप्रूफ मेकअपप्रमाणे रूहानी मेकअप मायाप्रूफ करावा लागतो.

चेहऱ्याचा केलेला मेकअप अल्पकाळाकरता असतो. तसेच मेकअप फार वेळा केल्याने त्वचा खराब होते. व खराब झालेली त्वचा झाकण्यासाठी पुन्हा मेकअप करावा लागतो. पण वाचक हो! हा रूहानी मेकअप सदाकाळासाठी आहे. एवढच नव्हे तर त्याने नुकसान न होता जसजसा तो पक्का होतो तसेतसे त्याच्यामुळे रूहानी आकर्षण वाढू लागते व आपण सर्वांच्या स्नेहास पात्र ठरतो. **चला तर मग हा रूहानी मेकअप करून सर्वत्र रूहानी रंगांची उधळण करूया. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या रूहानी मेकअपच्या आधारेच आपल्याला भविष्य २१ जन्मांकरिता विश्वाची राजाई प्राप्त होते.**

■■

वाचकांशी हितगुज

वाचकांनी/सेवाकेंद्रांनी एप्रिल २०१६ पासून सुरू होणाऱ्या नवीन वर्षाची 'अमृतकुंभ' ची मागणी फेब्रुवारी २०१६ अखेरपर्यंत कळवावी म्हणजे ती विचारात घेऊन अंक छापणे सुकर होईल. सर्व वाचकांनी सभासद संख्येत लक्षणीय वाढ करून, ईश्वरी सेवा वृद्धिंगत करण्यासाठी आवश्यक तो सहयोग द्यावा. घरोघरी ईश्वरी ज्ञानाचा अमृतकुंभ पोचविण्याचे लक्ष्य प्रत्येकाने आपल्यासमोर ठेवावे कारण अमृतकुंभ ज्याचे घरी, सुख-शांती तेथे वास करी.

- सध्याच्या वाढत्या महागाईमुळे सन २०१६-१७ च्या वर्गणीत पुढीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे. वार्षिक वर्गणी रु. ६५/- आणि आजीव सभासद वर्गणी रु. १३००/- इतकी असेल.
- सन २०१५-२०१६ ची अमृतकुंभची वर्गणी अद्याप थकित असल्यास, ती लवकरात लवकर प्रकाशक, अमृतकुंभ यांच्या पत्त्यावर पाठविण्याचा सहयोग द्यावा. तसेच डिमांड ड्राफ्ट पाठविताना तो 'अमृतकुंभ' च्या नावानेच पाठवावा.

-प्रकाशक, अमृतकुंभ

भाग-९

ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

- ब्र.कु. रमेश शाह, गावदेवी (मुंबई)

मागच्या लेखात आपण 'समर्पणमयता यावर विचार केला, जो ईश्वरी कारभारासाठी आवश्यक असा गुण आहे. प्रबंधन शिकविणाऱ्या, गुरूंचा दुसरा विषय आहे- डिव्होशन (Devotion) त्यास मराठीमध्ये श्रद्धा, ओढ, भक्ती किंवा निष्ठा म्हटले जाते. म्हणजे आपण जे काही कार्य करू ते पूर्णरित्या श्रद्धा व विश्वासाने भरपूर असावे. ते अगदी मनापासून व हृदयानिशी केले पाहिजे. ज्या कार्यामध्ये आपला संपूर्ण विश्वास नसेल किंवा त्याप्रति जर संशय असेल तर ते कार्य श्रेष्ठ रीतीने संपन्न होत नाही.

शास्त्रामध्ये सुद्धा अशा प्रकारच्या गोष्टी लिहिलेल्या आहेत. श्रीमद्भगवदगीतेमध्ये अर्जुनाची मनोदशा चित्रीत केली गेली आहे की, जेव्हा महाभारत युद्ध सुरू होणार होते तेव्हा अर्जुनाच्या मनात गोंधळ असा निर्माण झाला की युद्ध करावे किंवा नाही. कारण समोर युद्धाच्या मैदानात त्याचे नातेवाईक आणि वरिष्ठजन होते. त्यामुळे तो खूपच हताश आणि निराश झाला होता. तो युद्ध करू इच्छित नसल्याने त्याने आपली शस्त्रे खाली ठेवली. तेव्हा श्रीकृष्णाने पहिल्याच श्लोकात म्हटले आहे की, माझ्यामध्ये संपूर्ण निश्चय ठेवून कर्मफलाची इच्छा न ठेवता, तू जर युद्ध केलेस तर तुला सफलता प्राप्त होईल. अशा प्रकारे ज्ञान मिळाल्यानंतर शेवटी अर्जुन म्हणाला की, आता मी संपूर्ण नष्टोमोहा व निश्चयबुद्धी बनलो आहे आणि म्हणून मी आता युद्ध करीन. अशाप्रकारे अर्जुनाने श्रीकृष्णाच्या वचनांवर पूर्ण श्रद्धा ठेवून युद्ध केले आणि तो यशस्वी झाला.

इंग्रजी साहित्यामध्ये हॅम्लेट नावाचे एक पात्र आहे. त्याच्या समोरही असाच प्रश्न होता की, हे करू वा करू नको? यात तो गोंधळून गेला कारण, मार्गदर्शनासाठी त्याच्याजवळ श्रीकृष्णासारखा कुणी मार्गदर्शक नव्हता आणि म्हणून तो अयशस्वी झाला. आपण जीवनातील प्रत्येक कार्य जर मनापासून, श्रद्धेने किंवा दृढनिश्चयाने केले तर त्यात अवश्य सफलता प्राप्त होते.

माझ्या लहानपणी मी एक गोष्ट ऐकली होती.

एकदा एका गावात दुष्काळ पडला होता. तेव्हा लोकांनी ठरविले की, आपण सर्वांनी यज्ञ करायचा. जेव्हा यज्ञ सुरू झाला तेव्हा तेथे एक माणूस छत्री घेऊन आला. त्याला पाहून लोक हसू लागले व म्हणाले, 'पावसासाठी तर सारे यज्ञ करीत आहोत अन् हा तर छत्री पण घेऊन आला!' त्या व्यक्तिला त्याबाबत विचारणा केली गेली असता त्याने उत्तर दिले की, तुम्ही जेव्हा पावसासाठी यज्ञ करीत आहात, मग पाऊस तर पडणारच. परंतु तुम्ही परत जातेवेळी मग छत्र्या कुठून आणणार? पुढे तो म्हणाला की, जर तुम्हाला तुमच्या कार्यात पूर्ण श्रद्धा नाही तर मग सफलता कशी मिळेल? तुम्ही जेव्हा एका ध्येयाप्रती, संपूर्ण श्रद्धेने कार्य

इंग्रजी साहित्यामध्ये हॅम्लेट नावाचे एक पात्र आहे. त्याच्या समोरही असाच प्रश्न होता की, हे करू वा करू नको? यात तो गोंधळून गेला कारण, मार्गदर्शनासाठी त्याच्याजवळ श्रीकृष्णासारखा कुणी मार्गदर्शक नव्हता आणि म्हणून तो अयशस्वी झाला.

कराल तेव्हाच तुम्हाला सफलता मिळेल.

शास्त्रामध्ये असे एक उदाहरण आहे कि, एका राजाजवळ कुमारिल भट्ट नावाचा पंडित होता. राजाला संभ्रम होता की, वेद अपौरूषेय नसावे. परंतु पंडित कुमारिल भट्टचे म्हणणे होते की वेद अपौरूषेय आहेत. राजा त्याला म्हणाला की, जर वेद खरोखर अपौरूषेय असतील तर तुम्ही चार मजली इमारतीवरून उडी मारा. इतक्या उंचीवरून पडूनसुद्धा तुम्हाला काही झाले नाही तर वेद अपौरूषेय आहेत असे मी मानेन. कुमारिल भट्ट यांनी नंतर उडी मारली आणि त्यांचे दोन्ही पाय दुखापतग्रस्त झाले तेव्हा त्यांच्याही मनात संशय निर्माण झाला की वेद अपौरूषेय आहेत की नाहीत? त्यांनी मग ईश्वराची प्रार्थना केली व म्हणाले, हे भगवान! माझ्या बाबत हे असे कसे घडले? त्याचवेळी आकाशवाणी झाली की वेद अपौरूषेय आहेत; त्यात तुझी पूर्ण श्रद्धा नव्हती म्हणून तू म्हणाला होतास की, हे भगवान! जर वेद अपौरूषेय असतील तर मला काही होणार नाही। तुझ्या 'जर' या शब्दाने तुझ्या मनातील संशय व्यक्त केला आणि परिणामस्वरूप तुझे दोन्ही पाय तू गमावलेस. या गोष्टीतून आपल्याला धडा मिळतो की, कोणतेही कार्य करायचे असेल तर त्यात संपूर्ण निश्चय अथवा श्रद्धा असायला पाहिजे.

प्राणेश्वर शिवबाबांच्या यज्ञाच्या प्रत्येक ईश्वरीय कार्यात सदैव सफलता मिळते. तरीही जोपर्यंत ते कार्य संपन्न होत नाही, तोपर्यंत आपल्याला शाश्वती नसते.

यज्ञाच्या सुरुवातीच्या काळात शिवबाबा आणि ब्रह्माबाबा भिन्न आहेत हे सिद्ध करण्यासाठी शिवबाबांनी जो वेगळा रथ निवडला होता त्याचे नाव होते दादी पुष्पमणी. त्यांच्या शरीरात शिवबाबा सातत्याने १५ दिवस येत राहिले. एकदा दादी पुष्पमणिजी खाटेवर झोपल्या होत्या आणि बाहेर मातेश्वरीजी आणि दीदी मनमोहिनीजी चर्चा करीत होत्या व असा विचार करीत होत्या की, दादी पुष्पमणिजीच्या तनात अवतरित झाले ते कोण असतील? असा विचार ते करीत असतानाच दादी पुष्पमणिजीच्या तनात शिवबाबांनी प्रवेशता केली आणि खोलीच्या बाहेर येऊन म्हटले की, जेव्हा तुमचाच माझ्यावर निश्चय नाही तर मग तुम्ही दुसऱ्यांना माझ्याबाबत काय समजावणार? तुमच्या मनात संशय आहे की, शिवबाबा आणि ब्रह्माबाबा एक आहेत की वेगवेगळे आहेत, तो दूर करण्यासाठी मी या तनाचा आधार घेतलेला आहे. मी तुम्हाला भविष्यातील योजनांबाबत सांगू इच्छितो. परंतु जोपर्यंत माझ्यावर तुमचा पूर्णतः निश्चय नाही तोपर्यंत मी तुम्हाला कसे सांगू? त्यावर मातेश्वरीजी आणि दीदीने त्वरीत शिवबाबाची माफी मागितली आणि त्यानंतर त्यांनी शिवबाबांप्रति पूर्ण निश्चयात्मकबुद्धी ठेवून प्रत्येक कार्य केले. त्या दोघींचा शिवबाबांवरील दृढ विश्वास पाहून अन्य सारे ब्रह्मावत्सही निश्चयबुद्धी बनले. आणि त्यानुसार सर्वांनी यज्ञाची सेवा केली.

एकदा मी आबुला होतो. तेव्हा मातेश्वरीजी दिल्ली इ. ठिकाणी सेवा करून पुन्हा आबूला परतल्या होत्या. त्यावेळी हापुडमध्ये उद्‌भवलेल्या समस्यांबाबत त्यांनी सांगितले की, विघ्नकारी समूहाने बऱ्याच समस्या उभ्या केल्या होत्या. उदाहरणार्थ पाणी बंद केले होते, आवश्यक सामानांची खरेदी करू देत नव्हते इ. तसेच बलदेवभाई यांच्या अंगावर साप टाकला होता. हे सारे ऐकून माझ्या मनात प्रश्न आला की अशा स्थानी कशी सेवा होणार? तेव्हा मी प्रिय ब्रह्माबाबांना विचारले की, बाबा या सर्व समस्या ऐकताना तुम्हाला प्रश्न पडत नाही कां की, यज्ञाच्या स्थापनेचे कार्य कसे होईल? त्यावर ब्रह्माबाबांनी खूप सुंदर उत्तर दिले की, बच्चे, ड्रामावर माझा पूर्णपणे निश्चय आहे. ५००० वर्षांपूर्वी जशी यज्ञाची स्थापना झाली होती, त्याचप्रमाणे आता सुद्धा होत आहे. म्हणून माझ्या मनात काही संशय नाही. हे उत्तर ऐकल्यानंतर मी सुद्धा ड्रामामध्ये पूर्णतः श्रद्धा ठेवली.

सन १९७१ साली आम्ही सहा जण (दादी शिलइन्द्रा, जगदीशभाई, डॉ. निर्मला, रोजीबहन, ऊषाजी आणि मी) विदेश सेवेसाठी निघण्यापूर्वी सर्वांचा निरोप घेण्यासाठी मधुबनला आलो होतो. **निरोपाच्या वेळेस अव्यक्त बापदादा असे म्हणाले की, मी तुमच्यासाठी तेथे सर्व तयारी करून ठेवली आहे, तुम्हाला फक्त तेथे जाऊन बटन ऑन करण्याइतकीच मेहनत करायची आहे.** भारत सरकारने आम्हा प्रत्येकाला केवळ ६ डॉलरच बरोबर नेण्याची परमिशन दिली होती आणि आम्ही बाबांच्या श्रीमतावर पूर्ण श्रद्धा ठेवून, केवळ त्या ६ डॉलरसह साऱ्या विश्वाची सेवा करायला निघालो होतो. मुंबईहून जेव्हा विमानाने निघालो तेव्हा एअर हॉस्टेसने सर्वांना

बाबा या सर्व समस्या ऐकताना तुम्हाला प्रश्न पडत नाही कां की, यज्ञाच्या स्थापनेचे कार्य कसे होईल? त्यावर ब्रह्माबाबांनी खूप सुंदर उत्तर दिले की, बच्चे, ड्रामावर माझा पूर्णपणे निश्चय आहे.

हेडफोन दिले. जगदीशभाईंना वाटले की, काही गीत इ. ऐकावे पण त्यासाठी एअर हॉस्टेसने ३ डॉलर मागितले. जगदीशभाईने मला विचारले की, गीत ऐकू या? त्यावर मी म्हटले की, आपल्याकडे फक्त ६-६ डॉलर आहेत आणि त्यातील ३ डॉलर जर गीत ऐकण्यासाठी खर्च केले तर उरलेल्या ३ डॉलरमध्ये आपण काम कसे करणार?

ब्रुसेल्सला आम्ही पोहोचलो. तेव्हा, दोन वर्षापूर्वी इंटरनॅशनल योगा कॉन्फरन्स झाली होती त्यातील काही ओळख झालेल्या लोकांशी आम्ही संपर्क केला आणि मग तेथून आम्ही लंडनला गेलो. लंडनमध्ये इतकी सेवा होती की आमच्यातील चार प्रतिनिधींना लंडनमध्ये राहावे लागले आणि मी व निर्मलाबहेन न्यूयॉर्कला गेलो.

न्यूयॉर्कमध्ये आम्ही माझ्या एका मित्राच्या घरी गेलो. त्यावेळी आम्हाला Awosting Retreat च्या परिषदेत सहभागी व्हायचे होते. मित्राच्या घरापासून परिषदेचे स्थान १८० मैल दूर होते. त्या दिवशी रविवार होता म्हणून माझ्या मित्राने आम्हाला परिषदेच्या ठिकाणी सोडले. शिवबाबांवर आमचा पूर्ण विश्वास होता की, परतीच्या वेळेस आम्हाला नक्की काही सोय मिळेल. तेथे आम्हाला एक भाऊ भेटला, तो म्हणाला की, मी तुमची मुंबईतील प्रदर्शनी पाहायला आलो होतो आणि तुम्ही मला या कॉन्फरन्सचे निमंत्रण दिले होते. नंतर तो भाऊ आमच्याबरोबर ८ दिवस राहिला आणि त्यानेच परतीच्या वेळी आमच्या स्थानी आम्हाला सोडले. त्याच भावाने सेवेसाठी हॉल वगैरे शोधायला पुढे मदत केली. प्रदर्शनीसाठी आम्ही हॉल पाहायला गेलो होतो. तेव्हा हॉलची मालक असलेल्या भगिनीला आम्ही प्रदर्शनी आयोजित करू इच्छितो असे सांगितले. त्यावर त्या म्हणाल्या की, या हॉलचे दिवसाचे भाडे ३०० डॉलर आहे. मग त्यांनी विचारले की तुम्हाला ही प्रदर्शनी किती दिवसांसाठी करायची आहे. मी तात्काळ म्हणालो की, आम्हाला ११ दिवस प्रदर्शनी करायची आहे आणि त्यावेळी आमच्याजवळ तर फक्त ११ डॉलरच होते. मग त्या भगिनीने विचारले की, तुम्ही दर्शकांकडून किती मूल्य आकारणार आहात? आम्ही म्हणालो की, 'आम्ही ईश्वरी सेवा करीत आहोत म्हणून आम्ही कुणाकडूनही काहीही प्रवेश फी घेणार नाही. परमात्मा शिवपित्याने आम्हाला कुणाकडूनही काहीही मागायला शिकविले नाही. ते ऐकल्यावर ती बहीण म्हणाली की जेव्हा तुम्ही विनामूल्य सेवा करणार आहात तर मग मी तुमच्याकडून भाडे कसे घेऊ शकेल? तुमच्याकडून भाडे स्वीकारले तर माझ्या देशाची इज्जत जाईल. तिने आम्हाला हॉलची चावी दिली व म्हणाली, तुम्हाला जितके दिवस प्रदर्शनी करायची तितके दिवस करू शकता. त्यानंतर, प्रदर्शनीसाठी आम्हाला एका टेबलाची आवश्यकता होती, म्हणून आम्ही फर्निचरवाल्याशी बोलणं केले तेव्हा त्याने एका टेबलाचे दैनंदिन भाडे १ डॉलर सांगितले. आम्ही शिवबाबांच्या महावाक्यावर निश्चय ठेवून त्या दुकानदाराच्या मालकाकडे गेलो आणि त्यांना प्रदर्शनीचा उद्देश सांगितला. त्यावर त्याने अकरा दिवसांसाठी विनामूल्य फर्निचर दिले शिवाय त्याबरोबर टेबलक्लॉथही दिले. त्यानंतर आम्ही कार्ड छापण्यासाठी प्रिंटींग प्रेसमध्ये गेलो. त्याने ५०० कार्डसाठी ९ डॉलर घेतले. ते सुद्धा विनामूल्य मिळावे यासाठी आम्ही प्रयत्न केला पण ते झाले नाही. दुसऱ्या दिवशी अमृतवेळेच्या समयी मी शिवबाबांना म्हणालो, बाबा, तुम्ही सर्व कार्य विनामूल्य करून दिले मग यासाठी का पैसे द्यावे लागले? त्यावर मला उत्तर मिळाले की, मी जर तुम्हाला सहयोग दिला नसता तर या कार्याला किती खर्च करावा लागला असता, याचा अनुभव मी तुम्हाला देऊ इच्छित होतो म्हणून मी असे केले.'

त्यानंतर आमचे प्रतिनिधीसुद्धा न्यूयॉर्कला आले आणि प्रदर्शनी सफल झाली. **अशा प्रकारे सफलता आपला जन्मसिद्ध अधिकार आहे; परंतु आवश्यकता आहे ती परमात्म्यामध्ये असणाऱ्या आपल्या दृढ विश्वासाची! ईश्वरी सेवेत सदैव ध्यानात ठेवावे की, हे परमात्म्याचे कार्य आहे आणि आपण केवळ निमित्त होऊन कार्य करीत आहोत.**

शिवबाबांनी सांगितलेल्या सिद्धांताचा उपयोग जर आपण लौकिक कार्यात केला तर तेथेही सफलता मिळेल. बाबांच्या मुलांच्या दृढ निश्चयाची अशी हजारो सफलतेची उदाहरणे मिळतील. त्या अनुभवांचे पुस्तक बनू शकेल. ज्या भाऊ-बहिणींनी शिवबाबांवर संपूर्ण निश्चय ठेवून सफलता मिळविली असेल, अशांना माझा शतशत प्रणाम!

(भावानुवाद :
बी. के. जयश्री विक्रोळी, मुंबई)

शिवबाबांनी सांगितलेल्या सिद्धांताचा उपयोग जर आपण लौकिक कार्यात केला तर तेथेही सफलता मिळेल. बाबांच्या मुलांच्या दृढ निश्चयाची अशी हजारो सफलतेची उदाहरणे मिळतील.

अमृतकुंभाची अलौकिक महिमा

- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

अलौकिक प्रतिमा पाहूनी
मुखपृष्ठावरी मन आनंदे भरते ।
वाचन करिता अमृतकुंभाचे व्यर्थ
संकल्पांची मालिका सरते ।।१।।

ह्याची अमृताने देहाभिमानाचे
निर्दालन पूर्णतः होते. ।
संपूर्ण निर्विकारी व पावन
बनण्याची प्रेरणा अंतःकरणी येते ।।२।।

अमृतकुंभाच्या कारणे ज्ञानसंपन्न
योगी तू आत्मे संपर्कात येतात ।
आपुल्या प्रबोधनाद्वारे ते निर्बल
आत्म्यात बल भरुनी जातात ।।३।।

अमृतकुंभ वाचूनी अनेक
जिज्ञासू मधुबन पाहूनी येतात ।
सर्वोत्तम तीर्थक्षेत्रातील दिव्य
अनुभवाने ते तृप्त होतात ।।४।।

भिन्न भिन्न लेख व काव्य वाचण्या
अमृतकुंभ मित्रांना दिला जातो ।
केवळ एक अंक वाचूनी आत्म्याला
परमात्म संग प्राप्त होतो ।।५।।

अमृतकुंभ संबंधियांना देण्याची
अखंड सेवा होत राहावी ।
वर्गणीदार अतिरिक्त होवूनी गिनीज
बुकात त्याची नोंद व्हावी ।।६।।

कुंभातील हे अमृत प्राशन करिता
नारायणी नशा चढते ।
अन् कामक्रोधादि विकारांचे
विष आत्म्यातूनी उतरते ।।७।।

अमृतात ह्या अर्क असे
जन्मजन्मांतरीच्या जीवनमुक्तिचा ।
अर्क हा भिडता अंतःकरणी,
सत्वरी तुटतो पाश बंधनांचा ।।८।।

संगमयुगावरील ह्या अमृतपानाने
नवल तर हेची घडते ।
दोन युगे समस्त भारतीयांचे
ब्रह्मचर्य अखंडित राहते ।।९।।

आत्मोद्धाराचा अमृतकुंभ हा
सद्गुरु घेवूनी आले भूवरी ।
हे आत्मन्, तुझ्याच करकमलांनी
कुंभ घे आपुल्या मस्तकावरी ।।१०।।

अमृतकुंभाने आत्म्यांचा संबंध
निराकार परमात्म्याशी जोडला ।
बापदादा कुणाला म्हणावयाचे,
ज्ञान प्रकाश हा बुद्धीत पडला ।।११।।

वारीस पुत्रांना शोधण्या शिवपित्याने
अमृतकुंभाला निमित्त केले ।
महाराष्ट्रातील काही वारसदार
ह्या कुंभातूनी बाहेर आले ।।१२।।

परिपूर्ण ज्ञानाच्या अभावी
अनेक प्रश्न मनी निर्माण होतात ।
अमृतकुंभ वाचता वाचताच
उत्तरे त्याची सहज मिळतात ।।१३।।

अमृतकुंभाचे एक एक पृष्ठ
वाचता आत्मोन्नती होत राहते ।
चंद्रमासम सोळा कला संपन्न
बनण्याचे लक्ष्य निश्चित होते ।।१४।।

'काव्य लहान आशय महान्'
वैशिष्ट्य ते अमृतकुंभाच्या कवींचे ।
ज्ञानसंपन्न काव्यरचना वाचूनी
समाधान होते वाचकांचे ।।१५।।

ह्या द्वैमासिकाचे व्यवस्थापन
उत्तम आहे आरंभापासून ।
त्यातील प्रत्येक सेवाधारी
कार्य करीत आहे मनापासून ।।१६।।

संपादक व प्रकाशक आपली
भूमिका उत्कृष्टपणे बजावितात ।
अक्षर जुळणी व छपाई होताच
अंक वाचकांच्या हाती येतात ।।१७।।

गोदावरी दीदींच्या मार्गदर्शनाचा
प्रकाश लाभला अमृतकुंभाला ।
ज्ञानाच्या सर्वोच्च शिखरावरी
विराजमान करावे आत्म्याला ।।१८।।

अमरलोकाच्या निर्मितीत
अमृतकुंभ सहयोग देतच राहिल. ।
ह्याची कारणे अमृतकुंभ
नामाचे पूर्णतः सार्थक होईल ।।१९।।

कुंभातील हे अमृत पिवूनी
अमरत्त्व आपुले जागृत व्हावे ।
संपन्न स्थितीतच परमधाममार्गे
अमरलोकी प्रस्थान करावे ।।२०।।

भाग-३ (खास ब्रह्मावत्सांकरिता)

संगमयुगी ब्राह्मण जीवनाची अंतिम स्थिती-कर्मातीत

- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

कलियुगातील कोणत्याही महान व्यक्तीचा कसलाही प्रभाव आत्म्यावर होता कामा नये. मनुष्य आत्म्यावर प्रभावित झाल्याने वारंवार त्याचीच स्मृती येत राहते. बंधूंनो, 'प्रभावमुक्त स्थिती' अर्थात ना अन्य आत्म्याच्या कर्माचा प्रभाव, ना मायावी वैभवाचा, ना मायावी वातावरणाचा प्रभाव, ना स्वतःच्या प्रकृतीचा प्रभाव! अशा प्रभावमुक्त आत्म्याला केवळ परमात्माच प्रभावित करू शकतो. परंतु समस्त विश्वाला प्रभावित करण्यासाठी मात्र परमात्मा श्रेष्ठ फरिश्ता स्थिती प्राप्त केलेल्या, अलौकिक ब्राह्मण आत्म्यांची प्रत्यक्षता करेल. आपल्या सर्वांचा अंतिम पार्ट आहे साक्षात्कारी मूर्त बनणे; ज्या साक्षात्कारावर सारे विश्व प्रभावित होते. अर्थात, साक्षात्कार मूरत बनणारा आत्मा एक परमात्म्याशिवाय कोणावरही प्रभावित होत नाही. बापदादांना आपल्या संपन्नतेची, कर्मातीत होण्याची व भक्तांसाठी इष्टदेव बनण्याची तारीख हवी आहे. त्यांनी एका अव्यक्त वाणीत असेही म्हटले आहे की, तुमचे भक्त अत्यंत दुःखी झाले आहेत. त्यांची हाक तुमच्या कानावर येत नाही काय? तुम्ही मास्टर दयेचे सागर आहात. विश्वातील दुःखी आत्म्यांच्यावर दया करणे तसेच अशांत व अतृप्त आत्म्यांना तृप्त करणे हे कर्म, राजयोग्यांच्याशिवाय अन्य कोणीही करू शकत नाही. बंधूंनो, असे हे महान कर्म तोच राजयोगी करू



शकतो जो स्वतः तृप्त, संतुष्ट व संपन्न आहे. जो आपल्या शारीरिक व्याधीच्या बंधनातून व प्रभावातून पूर्णतः मुक्त आहे. अर्थात कोणत्याही व्याधीमुळे तो आपल्या श्रेष्ठ स्थितीला अंशमात्रही धक्का बसू देत नाही. ह्याचे उत्तम उदाहरण मम्मा-बाबांचे आहे. मम्मा-बाबा ज्ञान, योग, धारणा व सेवा ह्या चार विषयात इतके मग्न असत की, त्यांना आपल्या व्याधीची विस्मृती होत असे. जसे मनुष्यआत्म्याला स्मृतीचे वरदान आहे तसेच विस्मृतीचेही वरदान आहे. ह्या दोन्ही वरदानांचा यथायोग्य उपयोग करून कोणते कर्म स्मृतीत ठेवायचे अथवा कोणत्या कर्माची विस्मृती होऊ द्यायची ह्याचे संतुलन साधकाच्या बुद्धीत असावयास हवे. जर एखाद्या कर्माकडे मन अकारण ओढले जात असेल तर कर्मातीत स्थिती बनविण्यात फार मोठी बाधा निर्माण होत आहे असे समजावे. साधकाची पहिली सर्वसाधारण स्थिती आहे कर्माच्या अधीन होण्याची; दुसरी स्थिती आहे कर्माचा अधिकारी होण्याची; तिसरी आहे केलेल्या कर्माची व कर्मावरील अधिकारासहित कर्मफळाची सहज विस्मृती होण्याची स्थिती. कर्म करीत असताना परमात्म्याची स्मृती असेल तर अनावश्यक स्मृती जागृत होत नाही. म्हणून कर्मप्रधान न होता कर्मातही योग साधून योगप्रधान व्हावे. सर्वसाधारण आत्म्यांना आपल्या प्रिय व्यक्तीची सहज व सतत स्मृती येत असते. तद्वतच राजयोग्यालाही केवळ आपल्या प्राणेश्वर शिवबाबांची स्मृती निरंतर यायला हवी. परंतु ह्या स्मृतीचे भिन्न-भिन्न प्रसंगी खंडन होत असते. असे हे खंडन ब्राह्मण परिवारातही होत असते. सेवाअर्थ एखादा महारथी आत्मा सेंटरवर येणार असतो, परंतु तो वेळेत येऊ शकला नाही तर अनेकांचे चिंतन त्याच्याविषयी चालत राहते. आत्म्यांचा परमात्म्याशी संबंध असेल तर योग खंडित होऊन तो नकळत आत्म्याशी जोडला जाणे हे देखील सूक्ष्म कर्मबंधन आहे अशा ह्या सूक्ष्म कर्मबंधनाची जाणीव त्या महारथी आत्म्याला असल्याने तो आपल्या आत्मिक व श्रेष्ठ योगस्थितीद्वारे समस्त ब्रह्मावत्सांना दृष्टी देतो. अर्थात

तुमचे भक्त अत्यंत दुःखी झाले आहेत. त्यांची हाक तुमच्या कानावर येत नाही काय? तुम्ही मास्टर दयेचे सागर आहात. विश्वातील दुःखी आत्म्यांच्यावर दया करणे तसेच अशांत व अतृप्त आत्म्यांना तृप्त करणे हे कर्म राजयोग्यांच्याशिवाय अन्य कोणीही करू शकत नाही.

सर्वांची स्मृती शिवबाबांशी जोडून स्वतः कर्मबंधनमुक्त होतो. **लौकिक अथवा अलौकिक परिवारात तसेच समाजातही कोणाशी कर्मबंधन निर्माण होणार नाही ह्याची तो काळजी घेतो. योगाशिवाय कर्म केल्याने कर्मबंधन निर्माण होते. म्हणून कर्म अलग व योग अलग असे न करता तो कर्मात योग समाविष्ट करतो. फलस्वरूप त्या महारथींचे कर्म व स्थिती दोन्हीही श्रेष्ठ बनतात. स्थिती श्रेष्ठ असेल तर राजयोग्याच्या मनावर अन्य आत्म्यांच्या कर्मांचा बरावाईट परिणाम अंशमात्रही होत नाही.** त्याने केलेली सेवा कितीही सफल अथवा निष्फळ होवो; सेवेत मान-सन्मान प्राप्त होवो अथवा अपमान; त्याच्या श्रेष्ठ स्थितीला तो धक्का बसू देत नाही. असा धक्का आपल्याला बसू नये असे वाटत असेल तर आत्मिक दृष्टीची प्रॅक्टिस रस्त्यातून येता जातानाही अवश्य करावी. रस्त्यात एखादा मलीन भिकारी जरी दिसला तरी त्या मलीन शरीरवस्त्रात आत्मारूपी हिऱ्याला अर्थात परमात्म्याच्या संतानाला पाहण्याची प्रॅक्टिस कराल तर 'घृणा' हा छोटा विकारही आत्म्यातून निघून जाईल. आणि ज्यावेळी सर्व लहान-मोठे विकार समाप्त होतील त्याचवेळी 'संपूर्ण निर्विकारी' म्हणून आपले गायन होईल. असे संपूर्ण निर्विकारी बनावयाचे असेल तर कुणाच्याही पार्टविषयी अधिक चिंतन करू नये. अवगुणी आत्म्याविषयी दयेची व परिवर्तनाची शुभभावना ठेवून, साक्षीभावाने त्याचा पार्ट पहावा. साक्षीभाव ठेवणारा आत्माच कर्मबंधनमुक्त होऊ शकतो. अशी ही कर्मबंधनमुक्त स्थिती आत्म्याला कर्मबंधनमुक्त असलेल्या दोन श्रेष्ठ युगांसाठी श्रेष्ठ प्रारब्ध निर्माण करून देते.

मास्टर प्रेमसागर आत्म्याला प्रभू मीलनाद्वारे सदा लवलीन होण्याचा अर्थात अतींद्रिय सुखाचा अनुभव होत राहणे हेच कर्मयोगी आत्म्याचे प्रत्यक्ष फळ आहे. ह्या लवलीन स्थितीचा अनुभव कर्मयोगी आत्मा कर्म करीत असतानाही प्राप्त करू शकतो. कर्मयोगी आत्म्याचे प्रत्येक कर्म हे निर्धारित वेळेत उत्कृष्ट होते तसेच प्रत्येक कर्मात त्याला सफलताही प्राप्त होते. त्याला कोणतीही सेवा दिली तरी आपल्या उत्तम व्यवस्थापनाद्वारे तो ती सेवा सहज पार पाडतो. त्याच्या मनावर सेवेचा कोणताही तणाव अथवा दडपण येत नाही. मोठ्या सेवेतही तो मनोरंजनाचा अनुभव करतो. त्याच्या सफलतेचा एकमात्र आधार केवळ परमात्माच आहे. त्याविषयी त्याची संकल्पना हीच असते की, करनहार मी आत्मा असून करावनहार माझा शिवबाबा आहे. **कर्मयोगी आत्मा कर्मातीत स्थितीजवळ आल्यानंतर आवश्यक तितकेच बोलतो. अर्थात त्याने अधिक काळ मौनव्रत धारण केले असल्याने त्याला सहज वानप्रस्थ स्थिती प्राप्त झालेली असते. त्यासाठी त्याला वेगळा पुरुषार्थ करण्याची आवश्यकता नसते.** वाणीत येताना त्याचे प्रत्येक महावाक्य शक्तिशाली व परिणामकारक असते. महारथी त्यालाच म्हणावयाचे जो कर्मसंबंधात अवश्य येतो परंतु कर्म समाप्त होताक्षणी कर्माच्या स्मृतीला पूर्ण विराम देतो. अशा प्रकारचा पूर्ण विराम तोच देऊ शकतो जो ब्रह्माबापसमान सर्व गुण, सर्व शक्ती व ज्ञानरत्नांचा खजाना प्राप्त करून न्यारा व प्यारा राहण्याचा पुरुषार्थ करेल. पिताश्रींनी कर्मातीत होण्यापूर्वी न्यारा व प्यारा राहण्याची तसेच अशरीरी बनण्याची विशेष प्रॅक्टिस केली होती. त्यांच्या दृष्टीत रूहानियत असल्यामुळे ती अत्यंत शक्तिशाली झाली होती. ज्या ब्रह्मावत्साला ते दृष्टी देत तो ब्रह्मावत्स काही सेकंदात अशरीरी होत असे. त्यांच्या शक्तिशाली दृष्टीविषयी एक प्रसंग सांगितला जातो की, एके दिवशी बैठक योगाच्या समाप्तीनंतर पिताश्रींना त्यांच्यासमोर फणा काढलेला एक नाग दिसला. त्या नागालाही त्यांनी दृष्टी दिली असता फार मोठे आश्चर्य घडले! ते आश्चर्य म्हणजे तो नाग मागे न वळता, आहे त्या स्थितीतच मागे सरकत निघून गेला. अशा ह्या शक्तिशाली आत्मिक स्थितीचा उपयोग मात्र पिताश्रींनी सेवाअर्थ

केला. अंतिम श्वासापर्यंत त्यांनी संपर्कात असलेल्या ब्रह्मावत्सांची सेवा केली. **त्या अंतिम श्वासातही त्यांनी आपल्या अलौकिक पुत्रांना वरदान दिले की, 'बच्चो, निराकारी, निर्विकारी, निरअहंकारी भव'। अशाप्रकारे त्यांनी आपल्या अलौकिक पुत्रांची मातृवत पालना केली.** सर्वांच्याविषयी त्यांच्या

कर्मयोगी आत्म्याचे प्रत्येक कर्म हे निर्धारित वेळेत उत्कृष्ट होते तसेच प्रत्येक कर्मात त्याला सफलताही प्राप्त होते. त्याला कोणतीही सेवा दिली तरी आपल्या उत्तम व्यवस्थापनाद्वारे तो ती सेवा सहज पार पाडतो.

मनात किती कल्याणाची भावना होती हे त्यांच्या अंतिम महावाक्यावरून स्पष्ट होते. आजही पांडवभवनमधील त्यांच्या स्मृतिस्तंभाजवळ गेल्यानंतर बाबा तेथेच कोठेतरी असल्याचा भास होतो आणि हृदयातून त्या अलौकिक स्मृती गीताचे बोल उमटतात 'तुम तो यहीं कहीं बाबा मेरे आसपास हो। आते नजर नहीं पर मेरे साथ साथ हो। बहते पवन के झोके....'

अष्टशक्तींची महिमा अपरंपार आहे. अष्टशक्ती धारण केल्याशिवाय आत्मा ना सोळा कला संपन्न बनू शकतो, ना कर्मबंधनमुक्त बनू शकतो, ना जीवनमुक्त ना कर्मातीत बनू शकतो. अष्टशक्तीशिवाय आत्मा निर्बल आहे. अष्टशक्तींमुळेच शिवशक्ती संपन्न होऊ शकतात. म्हणून आत्म्याला शक्तिशाली व संपन्न बनविण्यासाठी अष्टशक्तीची धारणा अनिवार्य आहे. ह्या आठ शक्तींमध्ये दोन शक्ती साधकाला विशेष मदत करतात. त्या शक्ती आहेत सामावून घेण्याची व समेटून घेण्याची शक्ती. विस्तारात भटकणाऱ्या बुद्धीला सार रूपात आणण्यासाठी ह्या दोन शक्तींचा पुरेपूर उपयोग होतो. मानवी जीवनात देह, देहाचे संबंधी व देहाला लागणाऱ्या साधनांचा फार मोठा विस्तार आहे. ह्या विस्ताराला साररूपात आणण्यासाठी मी आत्मा बिंदी, माझे परमपिता बिंदी व ड्रामाही बिंदी आहे. परमात्म बिंदीतच विस्तारीत झालेले आजचे विश्व सामावलेले आहे. परमात्माच साकार मनुष्य सृष्टीच्या कल्पवृक्षाचे निराकार बीज आहे. हा निराकार परमात्मा आपल्या सर्वश्रेष्ठ स्थितीच्या सर्वोच्च अग्रावर सदा स्थित आहे. त्या अग्रावर मनबुद्धी एकाग्र करावयाची असेल तर समेटून घेण्याची शक्ती अत्यावश्यक आहे. समेटून घेण्याच्या शक्तीमुळे बुद्धीत असलेल्या विचारांच्या विस्ताराचे सार स्वरूप झाल्यामुळे साधक आपल्या विचारांना फुलस्टॉप देऊ शकतो. फुलस्टॉप देण्याच्या या वृत्तीमुळे तो योगयुक्त व कर्मबंधन मुक्त होऊन अंतिम परीक्षेत सहज पास होतो. अर्थात ही अंतिम परीक्षा अत्यल्प वेळाची असेल. ज्याप्रमाणे साधकाला वरील दोन शक्तीची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे त्याला नियंत्रण करण्याचीही शक्ती आवश्यक आहे. राज्याधिकारी त्यालाच म्हणावयाचे जो आपल्या कर्मेंद्रियांना व मनबुद्धीला नियंत्रित करून त्यावर राज्य करतो. तसेच तो अन्य आत्म्याच्या मनावरही राज्य करतो. नियंत्रण करण्याच्या शक्तीचा दीर्घकाळ केलेला अभ्यास व प्राप्त झालेला अनुभव साधकाला दीर्घकाळाचे दैवी राज्यभाग्य प्राप्त करवून देईल. अंतिम समयी अलौकिक पित्यासमान बनणारे आत्मेच पारलौकिक पित्यासमवेत परमधामी प्रस्थान करतील. अर्थात ब्रह्माबाबांचे संस्कार, त्यांनी प्राप्त केलेल्या शक्ती, त्यांचे गुणकर्तव्य व त्यांच्या अव्यक्त स्थितीप्रमाणे जे आत्मे समानता प्राप्त करतील तेच बापसमान कर्मातीत होतील. त्यासाठी शिवबाबांनी सर्व स्नेही ब्रह्मावत्सांना हेच श्रेष्ठ मत दिले आहे की, फॉलो फादर करून ब्रह्मा बाबांच्या कर्मरूपी पावलावर पाऊल ठेवीत जावे. त्यांची मुख्य पाच पावले पुढील प्रमाणे आहेत:-

पहिले पाऊल- तन, मन, धनाचा तसेच मनबुद्धीने तनाच्या (देहाच्या) संबंधितांसहित सर्वांचा त्याग करून पिताश्री हे शिवबाबांना समर्पण झाले.

दुसरे पाऊल- अलौकिक पिता असूनही त्यांनी मातृत्वाच्या भावनेने ब्रह्मावत्सांची पालना केली. त्यांच्या पालनेत सदा निमित्त भाव होता. त्यांनी कधीही शिवबाबांच्या आज्ञेचे उल्लंघन केले नाही.

तिसरे पाऊल- प्रत्येक कर्मात नव्हे तर त्यांच्या प्रत्येक संकल्पातही प्रामाणिकपणा होता. 'मेरा तो एक शिवबाबा दूसरा न कोई।' हा पाठ त्यांनी पक्का केला होता. 'एक बल एक भरोसा' ठेवून येणाऱ्या प्रतिकूल परिस्थितींना त्यांनी सहज पार केले.

चवथे पाऊल- पिताश्री जितके निर्माणचित्त होते, तितकेच ते बेफिक्र बादशहा होते. गृहस्थी मधील ब्रह्मावत्सांनी केलेल्या पवित्रतेच्या धारणेमुळे समाजातील सर्व स्तरातून त्यांना फार मोठा विरोध

परमात्माच साकार मनुष्य सृष्टीच्या कल्पवृक्षाचे निराकार बीज आहे. हा निराकार परमात्मा आपल्या सर्वश्रेष्ठ स्थितीच्या सर्वोच्च अग्रावर सदा स्थित आहे. त्या अग्रावर मनबुद्धी एकाग्र करावयाची असेल तर समेटून घेण्याची शक्ती अत्यावश्यक आहे.

झाला होता. इतका प्रखर विरोध असूनही ते आपल्या सत्यता व निर्भयतेच्या स्थितीपासून अंशमात्रही ढळले नाहीत. त्यांच्या सेवेतील सफलतेचा आधार होता स्नेहभाव, निमित्तभाव व बेहदचाभाव.

पाचवे पाऊल- सेवेबरोबरच विदेही स्थिती प्राप्त करण्यात ब्रह्माबाबा नं.१ होते. ह्याच स्थितीद्वारे त्यांनी कर्मातीत स्थिती प्राप्त केली. यांनी अनेक ब्रह्मावत्सांना आपसमान बनविण्याचा प्रयत्न करून त्यांनाही त्या स्थितीच्या जवळपास नेऊन ठेवले. फलस्वरूप आजही नवीन ब्रह्मावत्सांना बापसमान दीदी, दादींची व महारथी भाईंची पालना प्राप्त होत आहे. पिताश्रींनी साकार देहाच्या, देहाच्या संबंधियांच्या तसेच सर्वप्रकारच्या स्थूल व सूक्ष्म कर्मबंधनातून मुक्त स्थिती प्राप्त केली होती. केवळ कर्म करण्याअर्थ अल्पकाळ साकारी तर अधिक काळ ते निराकारी स्थितीत रमण करीत होते.

महाविनाशाच्या फायनल पेपरमध्ये पास व्हायचे असेल तर ब्रह्माबाबांच्या कर्मरूपी पाच पावलावर आपली कर्मरूपी पाच पाऊले ठेवावीत. अंतिम समयी परिस्थिती इतकी बिकट होईल की, भौतिक शरीराने त्याचा सामना करता येणार नाही. त्यासाठी सूक्ष्म शरीरधारी फरिश्ता बनावे लागेल. अर्थात अन्य आत्म्यांना भौतिक शरीराऐवजी सूक्ष्म शरीरच दिसावयास हवे. केवळ उर्वरित राहिलेला पार्ट बजाविताना भौतिक शरीरवस्त्र धारण करावे व कर्म समाप्त होताच शरीररूपी वस्त्रापासून अलग होण्याचा अभ्यास करावा. ज्याप्रमाणे इंजेक्शन दिल्यानंतर पेशंटच्या वेदना काही सेकंदात नाहीशा होतात, तद्वतच आपल्या अनादि स्मृतीच्या इंजेक्शनद्वारे जड देहाची स्मृती नष्ट करून स्वतःच्या डबल लाईट स्वररूपाचा अनुभव करावा. आपल्या दीर्घ काळाच्या स्वानुभावाद्वारे अन्य आत्म्यांनाही तोच अनुभव करविणे अर्थात कर्मातीत स्थितीच्या समीप पोहोचणे होय! अंतिम समयी सर्वत्र हाहाःकार माजेल. एका बाजूला पाच तत्त्वांची अस्थिरता, दुसऱ्या बाजूला भक्त आत्म्यांची अस्थिरता तर तिसऱ्या बाजूला अन्नधान्याच्या तुटवड्याची अस्थिरता माजेल. सर्व प्रकारच्या प्रतिकूल, भयावह व अशाश्वत परिस्थितीत साधक आपल्या शक्तिशाली व श्रेष्ठ स्थितीद्वारे परिस्थितीवर मात करून कशा प्रकारे अचल, अडौल व निश्चिंत राहतो हाच खरा फायनल पेपर आहे. अंतिम समयी अलौकिक परिवारातील दीर्घ काळाच्या, कोणत्याही अधिकाराच्या आधारे अधिविजयाची स्थिती प्राप्त होणार नाही. अनुकूल परिस्थितीच्या आधारावर प्राप्त होणारा अधिकार फायनल पेपरच्या विक्राळ परिस्थितीत नष्ट होऊ शकतो, **अशा विक्राळ व बिकट परिस्थितीतही जो साधक आपली आत्मिक स्थिती अबाधित ठेवून अन्य आत्म्यांचा आधार बनेल तोच अंतिम समयी वास्तविक अधिकारी असेल. असा अधिकारीच दैवी स्वराज्यातही उच्चप्रतीचा अधिकारी बनू शकतो**. बंधूंनो, दीर्घ काळाचा पुरुषार्थ करून प्राप्त केलेल्या अधिकाराच्याद्वारे दैवी युगातील अधिकार प्राप्त करणे म्हणजे अधिकाराने आपल्या मावशीच्या घरी जाण्याइतके सोपे निश्चितच नाही. अंतिम समयी कोणत्याही मनुष्य आत्म्याला अथवा

साधनाला आपला आधार बनवू नये. असा हा अशाश्वत आधार घेऊन सफलता प्राप्त करू इच्छिणारा साधक फायनल पेपरमध्ये नापास होण्याची शक्यता आहे. म्हणून आताच्या ह्या क्षणापासून एकमात्र परमात्म्यालाच आपला आधार मानून, स्वतःला बापसमान बनविण्यासाठी व पास विथ ऑनर होण्यासाठी आपल्या पुरुषार्थाची गती तीव्र करावी.

अव्यक्त बापदादांची पालना आजही अव्यक्त वाणीद्वारे, त्यांच्या दृष्टीद्वारे व अनेक वरदानांच्याद्वारे ब्रह्मावत्सांना प्राप्त होत आहे. पुरुषोत्तम संगमयुगाचा हा समय अत्यंत मौल्यवान आहे. केवळ ह्याच मौल्यवान समयात आत्मा साकार प्रभू मीलनाचा परमानंद प्राप्त करू शकतो. बापदादांशी मीलन! असे हे मीलन साध्य करण्यापूर्वी हजारो ब्रह्मावत्स योगयुक्त होऊन बापदादांना आवाहन करीत असतात. त्यावेळी 'हम उडके चले जायेंगे' हे गीत लावले जाते. त्या गीताने आत्मा अधिकच भावविवश होत जातो. सदर गीताद्वारे संपूर्णतेच्या

दीर्घ काळाचा पुरुषार्थ करून प्राप्त केलेल्या अधिकाराच्याद्वारे दैवी युगातील अधिकार प्राप्त करणे म्हणजे अधिकाराने आपल्या मावशीच्या घरी जाण्याइतके सोपे निश्चितच नाही. अंतिम समयी कोणत्याही मनुष्य आत्म्याला अथवा साधनाला आपला आधार बनवू नये.

समीप आलेल्या साधकांनी आपल्या अंतिम भावना प्रगट केल्या आहेत असेच वाटते. ह्या भावपूर्ण गीताचा भावार्थ आहे 'आपणा सर्वांना अत्यंत प्रिय अशा अव्यक्त वतनमध्ये फरिश्ता बनून जायचे आहे, जेथे आपले बापदादा आहेत. आपण सर्वांनी बापदादांना संपूर्ण बनण्याचे अभिवचन दिले आहे त्या वचन पूर्तीची वेळ आता समीप आलेली आहे. अव्यक्त वतनमध्ये जाण्यापूर्वी केवळ देह व देहाच्या संबंधितांचीच विस्मृती नव्हे तर ह्या जडजडीभूत झालेल्या पुराण्या दुनियेची देखील विस्मृती व्हायला हवी. आता स्मृती यायला हवी ती केवळ आपल्या अव्यक्त वतनाची व अव्यक्त बापदादांची. आम्हाला ह्या विकारी दुनियेशी काही देणे घेणे नाही. केवळ भविष्यात निर्माण होणारी निर्विकारी दुनिया (सत्ययुग) आमची आहे. ज्या दुनियेत ज्ञानरत्नांच्या आधारे दैवी गुणांचा शृंगार करून आम्हाला जायचे आहे, ह्या नूतन दुनियेत जाण्यापूर्वी आम्हाला आमच्या अव्यक्त वतनमध्ये जायचे आहे. जेथे बापदादा आमची प्रतीक्षा करीत आहेत. ही प्रदीर्घ काळाची प्रतीक्षा त्याचवेळी समाप्त होईल ज्यावेळी आपल्या सर्व ब्रह्मावत्सांचे अव्यक्त फरिश्ता रूपात अव्यक्त वतनमध्ये प्रस्थान होईल.' सदरहू गीत बापदादांचे आवडते गीत असावे. काळजाचा ठाव घेणारे हे गीत चालू असतानाच बहुधा बापदादा दादींच्या शरीरात अवतरित होतात. **पिताश्रींनी आपल्या अलौकिक पुत्रांची (ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारींची) व्यक्त (साकार) पालना ३३ वर्षे केली. त्यानंतरही सुमारे ४६ वर्षे अव्यक्त पालना करीत आहेत. त्यांच्या पालनेचा वास्तविक रिटर्न द्यावयाचा असेल तर त्यांच्यासमान पुरुषार्थ करून कर्मातीत स्थिती प्राप्त करावयास हवी. त्यासाठी १८ जानेवारीला पिताश्रींच्या ४७ व्या स्मृतिदिनानिमित्त बापदादांच्या प्रतिमेसमोर समस्त ब्रह्मावत्सांनी प्रतिज्ञायुक्त हाच संकल्प करावा की, 'ओ प्यारे बाबा, यदि हम आपके अलौकिक बच्चे है तो हम आपको यही वचन देते है कि आप जैसे संपूर्ण और संपन्न बनकरही दिखायेंगे। बाबा कल्प कल्प हम आप जैसे बने थे और हर बार अवश्य बनेंगे।' अशी ही कल्याणकारी प्रतिज्ञा करून त्या प्रतिज्ञेप्रमाणे जागृत होऊन तीव्र गतीचा पुरुषार्थ आरंभ करणे हीच त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना वाहिलेली भावसुमनांची अलौकिक श्रद्धांजली होय!** आपण सर्व राजऋषी आत्मे बापसमान स्थिती प्राप्त करून आपल्या प्रिय अव्यक्त वतनामध्ये बापदादांच्या सन्मुख जाऊ त्यावेळी त्यांनी केलेल्या दीर्घकालीन पालनेची फलश्रुती पाहून ते संतुष्ट व धन्य होतील. बंधुंनो, अशा ह्या अंतिम धन्यतेतच रुद्र ज्ञानयज्ञाची समाप्ती होऊन स्वर्णिम युगाच्या स्थूल स्थापनेचा शुभारंभ होईल. ज्यावेळी ह्या स्थापनेचे कार्य संपन्न होईल त्यावेळी स्वर्गीय वैभवाने शृंगारित झालेली ही भारतभूमी व त्यावरील रत्नजडित सुवर्ण महाल सोळा कला संपन्न अशा मर्यादापुरुषोत्तम देवात्म्यांची प्रतीक्षा करीत असतील. अशाप्रकारे कर्मातीत स्थिती प्राप्त करण्यामध्ये कोणते महान व कल्पनातीत असे प्रारब्ध सामावलेले आहे हे केवळ शिवबाबांना, ब्रह्माबाबांना व ब्रह्मावत्सांनाच ज्ञात आहे. कारण अन्य आत्म्यांच्या बुद्धीची झेप या महान प्रारब्ध्याच्या ज्ञानापर्यंत पोहचू शकत नाही. आणि कदाचित त्यांनी ती झेप घेतली तर तेही ह्या महान प्रारब्धाचे अधिकारी बनण्यासाठी आपल्या बुद्धिमत्तेच्या आधारे कमी वेळात तीव्र गतीचा पुरुषार्थ करून उर्वरित राहिलेल्या ह्या अमूल्य व अत्यल्प समयी केवळ बापसमान बनण्याचाच ध्यास घेतील. फलस्वरूप त्यांच्या अंतर्आत्म्यातून निरंतर एकच ध्वनी येत राहील. अर्थात तो ध्वनी असेल बापसमान कर्मातीत! कर्मातीत!! व केवळ कर्मातीत!!! माझ्या प्रिय बंधुंनो, निमित्तमात्र बनून कर्मातीत स्थितीवरील लिहिलेला हा लेख, आपल्याला कर्मातीत बनण्याची नक्कीच प्रेरणा प्रदान करेल, अशी माझी खात्री आहे.

■■

ज्या दुनियेत ज्ञानरत्नांच्या आधारे दैवी गुणांचा शृंगार करून आम्हाला जायचे आहे, ह्या नूतन दुनियेत जाण्यापूर्वी आम्हाला आमच्या अव्यक्त वतनमध्ये जायचे आहे. जेथे बापदादा आमची प्रतीक्षा करीत आहेत. ही प्रदीर्घ काळाची प्रतिक्षा त्याचवेळी समाप्त होईल

ब्र. कु. सुभाषभाई,
ज्ञानसरोवर, मा. आबू

विदेशात पसरत आहे आध्यात्मिक ज्ञानाचा प्रकाश

ब्रह्माकुमारी संस्थेच्या पूर्व मुख्य प्रशासिका दादी प्रकाशमणी जेव्हाही विदेशी बंधु-भगिनींना भेटत असत तेव्हा त्या नेहमी म्हणत की तुम्ही पूर्वजन्मात भारतातच राहात होता. आता या अंतिम जन्मात भारतीय संस्कृतीचा विस्तार करण्याच्या ईश्वरी सेवेसाठी तुम्ही भिन्न-भिन्न ठिकाणी, भिन्न-भिन्न संस्कृतीत गेले आहात. आपण जाणतो की दादी जानकीजींनी सन १९७४ पासून विदेश सेवेची जबाबदारी अतिशय उत्तमरीतीने सांभाळली. त्यांनी आपल्या योगबळावर तसेच दिव्य गुणांच्या धारणेच्या बळावर पाश्चात्य जगात आध्यात्मिक ज्ञानाचा प्रकाश पसरविला. वास्तविक तेथील लोकांचे जीवन हे भौतिकता व भोगविलास यांच्यात पार बुडून गेले आहे. अशा परिस्थितीत मानवी मूल्यांनी ओत-प्रोत असलेल्या दादीजींच्या निर्मल व पवित्र जीवनाद्वारे विदेशी बंधु-भगिनींच्या जीवनात परिवर्तन घडून आले.

त्यामुळे मला देखील दादी जानकीजींची कर्मभूमी असलेल्या लंडन शहराला भेट देण्याची फारच उत्कंठा होती. तेथे दादीजींनी रात्रंदिवस ईश्वरी सेवा करून अनेक आत्म्यांचे जीवन श्रेष्ठ बनविले आहे. दादीजी व ब्र.कु. जयंती बहेन यांच्या मार्गदर्शनानुसार मला इंग्लंड व युरोप यात्रा करण्याची सुवर्णसंधी मिळाली. ८ जून ते ३० जुलै २०१५ या कालावधीत मला युरोप मधील संस्कृतीचा जवळून अनुभव करता आला. तेथील ब्राह्मण परिवारात मिसळल्यावर विश्वबंधुत्त्व भावना मनात खोलवर बिंबली.

विदेशी ब्रह्माकुमार बंधु-भगिनींचे अलौकिक जीवन

युरोपियन लोकांचे आचार-विचार, खाणे-पिणे तसेच त्यांचे राहणीमान भारतीयांच्या तुलनेत फारच भिन्न आहे. तेथील लोकांना निरनिराळ्या व्यसनांची सवय आहे आणि त्याला ते वाईटही मानत नाहीत. अशा विपरीत परिस्थितीत तेथील लोकांना सात्विक खाणे-पिणे व पवित्र जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे, हे खरोखर अद्‌भूत परमात्म शक्तीचे प्रत्यक्ष प्रमाण आहे.

तेथे नियमित राजयोगाचा अभ्यास करणारे तसेच ब्रह्माकुमारी सेवाकेंद्राचे संचालन करणारे बहुतांशी ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी हे लौकिक नोकरी व व्यवसाय करतात. त्यांची दिनचर्या ब्रह्ममुहूर्तावर ४ वाजल्यापासून सुरू होते. मुख्य म्हणजे ते अमृतवेळेचा योग (सकाळी ४ ते ५) कधीही चुकवत नाहीत. कित्येक जण स्नान वगैरे आटोपून ऑफिसला जायची सर्व तयारी करून, सकाळी सेंटरवर मुरली ऐकण्यासाठी येतात. मुरली संपल्यानंतर तेथूनच ते आपल्या कार्यक्षेत्रावर जातात. अशा प्रकारचा समर्पण भाव तसेच ईश्वरी नियमांवर मनापासून प्रेम करणारे तपस्वी

युरोपियन लोकांचे आचार-विचार, खाणे-पिणे तसेच त्यांचे राहणीमान भारतीयांच्या तुलनेत फारच भिन्न आहे. तेथील लोकांना निरनिराळ्या व्यसनांची सवय आहे आणि त्याला ते वाईटही मानत नाहीत.

ब्रह्मावत्स विदेशात मला पाहायला मिळाले. त्यांची अथक दिनचर्या पाहून मन श्रद्धा भावनेने भरून आले. तेथे इंटरनेटची सुविधा सर्वत्र असूनही, मुरली ऐकण्यासाठी दूरवरून ब्रह्मावत्स सेवाकेंद्रांवर येतात. तेथील सर्व ब्रह्मावत्सांना हा पक्का विश्वास आहे की निकट भविष्यात येणाऱ्या सत्ययुगी दुनियेचा केंद्रबिंदू भारतच असेल. भारतातच निराकार शिव परमात्मा अवतरित होऊन, सुख-शांतिमय सत्ययुगी दैवी दुनियेची स्थापना करीत आहे.

अत्याधिक व्यस्त जीवनशैली

युरोपमधील प्रत्येक व्यक्ती आपली नोकरी, व्यवसाय, पैसा आणि कायदे यांच्यात असा जखडला गेला आहे की आपण भारतीय त्यांच्या व्यस्त जीवनाची

कल्पनाही करू शकणार नाही. तेथे आपल्याला एकापेक्षा एक सरस कार बघायला मिळतील; परंतु त्या कारची सफाई करण्यापासून, तिला चालविण्याचे काम मात्र स्वतःलाच करावे लागते. अगदी पेट्रोलसुद्धा स्वतःच्या हाताने भरावे लागते. तेथील घरे अतिशय सुंदर आहेत. त्यात सर्व सुखसोयी आहेत. परंतु त्याची साफ-सफाई स्वतःच करावी लागते. कारण तेथे इतकी महागाई आहे की घरकामासाठी नोकर ठेवण्याचा विचारही कोणी करू शकत नाही. त्यामुळे प्रत्येक मनुष्य सकाळपासून संध्याकाळ पर्यंत, सोमवारपासून शुक्रवार पर्यंत एखाद्या मशीनसारखा धावत असातो. शनिवारी व रविवारी घरातील सर्व कामे त्याची त्यालाच करावी लागतात. (आजकाल भारतातदेखील मुंबईसारख्या शहरातून हेच दृश्य पाहायला मिळते.) त्यामुळे एक दुसऱ्याशी बोलायला देखील कुणाकडे वेळ नसतो. अशाप्रकारे वर्षभर सतत तणावाखाली काम करावे लागल्याने, वर्षातून दोन महिने ते सुट्टी (हॉली डे) घेतात व एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जाऊन, रिफ्रेश होण्यासाठी आपली सर्व अतिरिक्त कमाई खर्च करतात.

विदेशातील कायदा-व्यवस्था

तेथील सरकार जनतेला खूप सुख-सुविधा पुरवते परंतु सर्वांना कायद्याची बंधने पाळावी लागतात तेथील रस्ते अतिशय सुंदर व स्वच्छ आहेत परंतु तेथे ज्या स्पीडने गाडी चालविण्याविषयी निर्देश असतील त्यांचे काटेकोर पालन करावे लागते. आपल्या हातून जरासुद्धा नियमांचे उल्लंघन झाले तर कॅमेऱ्यातून आपला फोटो काढला जातो. व दंडाच्या रकमेची पावती आपल्या घरी पाठविली जाते. जेथे पार्किंग असेल तेथेच गाडी उभी करता येते. इतरत्र कुठेही गाडी उभी करता येत नाही. समजा आपल्याला बस अथवा ट्रेनने प्रवास करायचा असेल तर कुणालाही बिना तिकीट प्रवास करता येत नाही. तेथे सर्व देवाण-घेवाण कार्डाच्या सहाय्याने होते. तसेच लोकसंख्या कमी असल्याने, कुठेही गर्दी वा रांगा दिसत नाहीत. तेथे सर्वत्र कार्ड सिस्टीम असल्याने रेल्वे स्टेशनमध्ये प्रवाशांशिवाय दुसरा कोणी प्रवेशही करू शकत नाही. (आजकाल भारतातही मेट्रो रेल्वे स्टेशनवर या पद्धतीचा वापर केला जातो.) तेथे कुठलीही समस्या आली तरी पोलीस आपल्या मदतीसाठी तत्पर असतात. काही मिनिटातच ते आपल्या समस्येचे समाधान करतात. तेथील वाहतूक इतकी शिस्तबद्ध असते की माझ्या ५२ दिवसाच्या वास्तव्यात मला केवळ ३-४ वेळा गाड्यांचा हॉर्न ऐकायला मिळाला. परिणामतः तेथे ध्वनी प्रदूषण आढळून येत नाही.

भोजन पद्धती

येथील लोकांची भोजन पद्धती फारच वेगळी आहे. ज्याला भूक लागते तो आपल्याला हवे तेव्हा खात असतो. असे जरुरी नाही की दिवसात ठराविक वेळेला घरी जेवण बनवलेच पाहिजे. कित्येक लोक तर आठवड्यातून एकदाच घरी जेवण बनवितात. बहुतांश लोक हॉटेलमध्येच खातात. कित्येक जण ट्रेनमध्ये प्रवास करताना खातात. एकदा आम्हाला निरोप देताना खास डिनरचे (रात्रीच्या जेवणाचे) आयोजन करण्यात आले होते. त्यात ६ प्रकारचे सॅलड, फळे, ज्यूस, ब्रेड व चीज यांचा समावेश होता. ते पाहून आम्ही जरा विचारातच पडलो. परंतु शिवबाबांच्या आठवणीत आम्ही त्याचा मोठ्या आनंदाने स्वीकार केला. तेथील भोजन अतिशय पौष्टिक वा जीवनसत्त्वांनी परिपूर्ण असते. भारतातील जेवणासारखे चविष्ट मात्र नसते. तेथील खाण्या-पिण्याच्या वस्तू अतिशय साफ व स्वच्छ असतात. कुठेही माशा, मच्छर वा झुरळ दिसणार नाही. तेथे प्रत्येकजण स्वतःच्या हाताने हवे तितकेच वाढून घेत असल्याने, अन्न वाया जात नाही. तेथे पाण्याच्या शुद्धतेकडे देखील

समजा आपल्याला बस अथवा ट्रेनने प्रवास करायचा असेल तर कुणालाही बिना तिकीट प्रवास करता येत नाही. तेथे सर्व देवाण-घेवाण कार्डाच्या सहाय्याने होते. तसेच लोकसंख्या कमी असल्याने, कुठेही गर्दी वा रांगा दिसत नाहीत.

ट्रेनमध्ये प्रत्येक सीटवर इलेक्ट्रीक बोर्ड, फोल्डिंग टेबल, लाइट व्यवस्था, वाय-फाय इत्यादी सुविधा असल्याने, कोणीही लॅपटॉपवर आपले काम करू शकतो. प्रत्येक डब्यात एक बोर्ड असतो ज्यावर गाडीचे स्पीड, गाडी किती मिनिट लेट आहे तसेच पुढील स्टेशन या सर्व गोष्टी दर्शविल्या जातात.

विशेष लक्ष दिले जाते.

युरोपमधील रेल्वे

तेथील ट्रेन ताशी ३०० कि.मी. च्या स्पीडने जाताना आम्ही जेव्हा पाहिली तेव्हा खरोखर आश्चर्य वाटले. विमानात जशी व्यवस्था असते. त्यापेक्षाही अधिक चांगली व्यवस्था ट्रेनमध्ये असते. ट्रेनमध्ये एका कोचमध्ये किचन व डायनिंगची व्यवस्था असते. तेथे बसून यात्री चहा-पाणी व भोजन करू शकतो. जे लोक सकाळी-सकाळी कामावर जातात ते बहुतेक ट्रेनमध्येच नास्ता करतात. ट्रेनमध्ये प्रत्येक सीटवर इलेक्ट्रीक बोर्ड, फोल्डिंग टेबल, लाइट व्यवस्था, वाय-फाय इत्यादी सुविधा असल्याने, कोणीही लॅपटॉपवर आपले काम करू शकतो. प्रत्येक डब्यात एक बोर्ड असतो ज्यावर गाडीचे स्पीड, गाडी किती मिनिट लेट आहे तसेच पुढील स्टेशन या सर्व गोष्टी दर्शविल्या जातात. काही विशेष घटना घडली असेल तर तशी अनाऊंसमेंट देखील केली जाते. मुख्य म्हणजे तेथील ट्रेन एकदम वेळेवर असतात.

समानतेचा भाव अधिक प्रमाणावर

तेथे समानतेचा भाव अधिक प्रमाणावर पाहायला मिळाला. तेथे श्रीमंत कोण, गरीब कोण हे लक्षात येत नाही कारण सर्व एकसारखे राहतात. त्यामुळे तेथे कोणी व्ही.आय.पी. वाटत नाही. आम्ही लंडनमध्ये एका कार्यक्रमासाठी गेलो होतो; तेथे भारताचे राजदूत मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यावर ते स्वतः आपली गाडी चालवत घेऊन गेले. त्यांच्याकडे ड्रायव्हर नव्हता, संरक्षणासाठी पोलीस नव्हता किंवा गाडीला लाल दिवा नव्हता. अशाप्रकारे सर्वांसाठी एकसारखा कायदा आहे. आपण कुठेही गेलो तरी; म्हणजे टोलनाक्यावर, पार्किंगसाठी किंवा बसमध्ये गेलो तरी आपल्यासमोर एक मशीन असते तेथे आपल्याला कार्ड दाखवावे लागते. ते मशीन फक्त कार्ड ओळखते, आपल्याला नाही. त्यामुळे सर्वांसाठी एकसारखी सिस्टीम आहे.

तेथे लोकसंख्या कमी असल्यामुळे कुठेही रांगा लावाव्या लागत नाहीत किंवा धक्का-बुक्की होत नाही. आपण कुठेही (सार्वजनिक ठिकाणी) गेलो तरी तेथे गेल्यावर आपल्याला एक नंबर घ्यावा लागतो. तो घेतल्यावर आपण आरामात बसू शकतो. जेव्हा आपला नंबर बोर्डावर दर्शविण्यात येईल तेव्हा आपण संपर्क साधू शकतो परंतु भारतात लोकसंख्या खूपच जास्त असल्याने, आपल्याकडे कुठलीही सिस्टीम फेल होते. (आजकाल रेल्वे रिझर्वेशनसाठी तसेच बँकातून ही सिस्टीम वापरली जाते. तरीही वेळ लागायचा तो लागतोच. आपल्याकडे नंबर घेण्यासाठीसुद्धा रांग लावावी लागते.)

विदेशातील ईश्वरी सेवेचा विस्तार

अशा रीतीने युरोपमधील जीवनशैलीची ठळक वैशिष्ट्ये आपण पाहिली. तेथील अनेक प्रेक्षणीय स्थळांना आम्ही भेटी दिल्या. त्याचबरोबर विभिन्न देशातील सेवाकेंद्रांना देखील भेटी दिल्या. आम्ही ज्या ज्या ठिकाणी गेलो तेथे ज्ञानचर्चा, योगभट्टी वा स्नेहमीलनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तेथील ब्रह्मावत्सांना भेटून असे अनुभवाला आले की सर्वजण ईश्वरी ज्ञानासाठी खूप आसुसलेले आहेत. त्यांची भाषा, संस्कृती जरी भिन्न असली तरी सर्वांच्या मनात ईश्वराविषयी अतूट श्रद्धा वा भावना आहेत. त्यांच्यातील बरेच जण प्रभुमीलनासाठी मधुबनला येऊन गेले आहेत. परमात्म मीलनाचा परमानंद त्यांनी घेतला आहे. त्यामुळे फरिश्ता बनून आध्यात्मिक ज्ञानाचा प्रकाश आपल्या सर्व बांधवांपर्यंत पोचविण्याची सेवा ते करीत आहेत. फलस्वरूप आज सुमारे १४० देशातून आपल्या संस्थेची सेवाकेंद्रे निस्वार्थ भावनेने सेवारत आहेत. ही खरोखर अभिमानाची गोष्ट आहे.

आता तो दिवस दूर नाही जेव्हा

आपला भारत देश पुन्हा विश्व गुरुच्या रूपाने प्रत्यक्ष होईल. कारण सद्गुरु शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण भारतातच पुन्हा झाले आहे. तसेच ज्ञानसूर्य शिव परमात्म्याच्या ज्ञानाचा प्रकाश साऱ्या विश्वात झपाट्याने पसरत आहे. याविषयी एक सुंदर गीत आहे-

अंधियारे सभी मीट गये,
उजियारा छा गया।
ज्ञानसूर्य फिरसे
शिव प्यारा आ गया... ■■



स्वउन्नतीमध्ये बाधक-आळस, बेपर्वाई व बहाणेबाजी

ब्र.कु. भगवानभाई शांतिवन, आबू रोड

मनुष्याच्या पतनाचे मूळ कारण आहे देहअभिमानामुळे निर्मित ५ विकार (काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार). या पाच विकारांच्या वशीभूत झाल्याने त्याचे मनोबल, आत्मबल कमजोर होऊन, त्याच्या मनातील विचारांचा वेग वाढला आहे. तसेच ईर्ष्या, द्वेष, घृणा, वैर-विरोध, परचिंतन इत्यादी अवगुणांची उत्पत्ती झाली आहे. या विकारांमुळेच आजचा मानव हा दानव बनला आहे. तात्पर्य म्हणजे मनुष्याच्या जीवनातील सर्व समस्यांचे मूळ कारण हे विकार आहेत. परिणामतः मानवाचे जीवन नरकतुल्य बनले आहे.

या विकारांपासून सुटका व्हावी म्हणूनच मनुष्य परमेश्वराला शरण जाऊन त्याची भक्ती करीत आहे. या भक्तीचे फळ देण्यासाठी स्वतः निराकार शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण झाले आहे. मनुष्य आत्म्यांची विषय-विकारांपासून सुटका व्हावी म्हणून परमात्म्याने प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची स्थापना केली आहे. तेथे शिकवल्या जाणाऱ्या सहज राजयोगाद्वारे मनुष्य संपूर्ण निर्विकारी स्थितीचा अनुभव करू शकतो. जो साधक सहज राजयोगाच्या आधारे विकारांवर विजय प्राप्त करतो तो वर्तमान मानव जीवनाचा आनंद तर प्राप्त करतोच परंतु भविष्यातही स्वर्गात (सत्ययुग व त्रेतायुगात) विश्व महाराजा-महाराणी बनू शकतो. एवढंच नव्हे तर या ५ विकारांशी युद्ध करताना एखादा साधक पराजित झाला तरी त्याला स्वर्गात सुखाची प्राप्ती अवश्य होते. फक्त स्वर्गातील त्याचे पद कमी असते. याचेच प्रतीक म्हणून गीतेतही भगवंत अर्जुनाला बजावून सांगतात की हे पार्थ, तू रणांगणावर युद्ध कर; म्हणजे तू स्वर्गात जाशील. या युद्धात तुझा पराजय झाला तरीसुद्धा तू स्वर्गात जाशील. त्यामुळे तू युद्ध कर, माघार घेऊ नकोस. **खरं तर वर्तमान समयी हे युद्ध चालू आहे. लाखो ब्रह्मावत्सांनी या ५ विकारांशी युद्ध करण्यासाठी भाग घेतला आहे. कित्येक वर्षापासून ते युद्ध करीत आहेत. कित्येकांनी हे युद्ध जिंकले देखील आहे. या युद्धात पराजय होऊ नये यासाठी प्रत्येक साधकाने आळस, बेपर्वाई (अलबेलापन) व बहाणेबाजी या तीन गोष्टींपासून सदैव दूर राहिले पाहिजे कारण या तीन गोष्टीच स्वउन्नतीमध्ये बाधक आहेत. या तीन गोष्टीच विकारांचे उगमस्थान आहे. म्हणूनच यांचा त्याग करून सदैव जागरूक (अलर्ट) व क्रियाशील (ॲक्टीव) राहून प्रत्येक कर्म ईश्वरी नियम व मर्यादा अनुसार केले पाहिजे.**

तसे पाहिले तर आळसाला सहावा विकारसुद्धा म्हटले जाते. त्यामुळे पुरुषार्थी जीवनात आळसाला मोठा शत्रू समजून, त्यापासून दूर राहिले पाहिजे. तरच आध्यात्मिक उन्नती झपाट्याने होत जाईल. फलस्वरूप आपण आपले लक्ष्य वेळेवर प्राप्त करू शकू. याविषयीची कासव आणि ससा यांची गोष्ट आपण सर्वजण जाणतोच. सदरची गोष्ट अतिशय अर्थपूर्ण आहे. केवळ आळसामुळे ससा

गीतेतही भगवंत अर्जुनाला बजावून सांगतात की हे पार्थ, तू रणांगणावर युद्ध कर; म्हणजे तू स्वर्गात जाशील. या युद्धात तुझा पराजय झाला तरी सुद्धा तू स्वर्गात जाशील. त्यामुळे तू युद्ध कर, माघार घेऊ नकोस.

शर्यत हरतो. वर्तमानसमयी अशीच स्थिती काही ब्रह्मावत्सांची आहे. जेव्हा ते आळस, बेपर्वाई किंवा बहाणेबाजीच्या वशीभूत होतात तेव्हा त्यांना वाटते की आपण तर कित्येक वर्षापासून ज्ञानात चालत आहोत. खूप सेवा केली आहे. आज अमृतवेळेला उठलो नाही किंवा मुरली ऐकली नाही, तर चालेल. विनाशाच्या वेळी आपल्याला वैराग्य येईल तेव्हा आपण चांगला पुरुषार्थ करून, अवश्य विजयी बनू. आता तर साधन-सुविधांचा, मान-सन्मानाचा फायदा घेऊ या. ड्रामा तर 'बना बनाया' आहे. आपण इतके मोठे महारथी तर नाही. अशा प्रकारच्या व्यर्थ चिंतनाच्या गाढ निद्रेत ते झोपी जातात. परिणामतः प्रभु मीलनाचा अमूल्य वेळ वाया घालवतात. याउलट जे पुरुषार्थी आपल्या जीवनातील एक-एक सेकंद सफल करतात ते त्यांच्या अथक प्रयासामुळे आपले ध्येय गाठून, सहजच विजय माळेचे मणी बनतात.

आळस हा सर्वप्रथम आपल्या मनामध्ये येतो. मनातील नकारात्मक आणि व्यर्थ विचार हेच आळसाचे उगमस्थान आहे. जेव्हा मनामध्ये नकारात्मक आणि व्यर्थ विचार येतात तेव्हा त्याचा परिणाम शरीरामध्ये थकावट, निर्माण होऊन, आपण कोणत्याही गोष्टीची टाळाटाळ करतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आळस, बेपर्वाई व बहाणेबाजी हे तिन्ही विकार एक दुसऱ्याशी निगडित आहेत. प्रथम मनात आळस येतो. त्यातून बेपर्वाई येते आणि नंतर बहाणेबाजी करायला सुरुवात होते. उदा. अमृतवेळेला आळसामुळे प्रथम असा विचार येतो की अजून ५-१० मिनिट झोपू या. थोड्या वेळाने जाग आल्यावर बेपर्वाईमुळे विचार येतो की एखादा दिवस अमृतवेळेचा योग केला नाही तर काय बिघडेल? त्यानंतर अमृतवेळेचा वेळ जेव्हा निघून जातो तेव्हा स्वतःला खूश करण्यासाठी बहाणेबाजी सुरू होते. रात्री उशिरा झोपलो होतो, डोके दुखत होते, काल प्रवास करून थकवा आला होता म्हणून अमृतवेळेला उठलो नाही. अशा प्रकारची बहाणेबाजी करून, आपण ईश्वरी नियम व मर्यादांचे उल्लंघन करतो. त्याचा परिणाम म्हणजे जुने विकारी संस्कार पुन्हा जागृत होतात व आपल्या हातून विकर्म घडू लागतात. फलस्वरूप आजवर केलेली कमाई संपुष्टात येते म्हणूनच आळस, बेपर्वाई व बहाणेबाजीला साधारण समजू नका त्यांच्यापासून सदैव सावधान राहा.

मुख्य म्हणजे या तिघांच्या वश होणारा पुरुषार्थी देहभानात येतो. त्यामुळे ५ विकारांच्या वश झाल्याने त्याची हार होते. याविषयी महाभारतामध्ये एक उदाहरण आहे. अर्जुनाचा पुत्र अभिमन्यू खूप हुशार योद्धा होता. परंतु कौरवांच्या सैन्याकडून तो एक दिवस मारला गेला. एके दिवशी कौरवांनी चक्रव्यूह रचला आणि अभिमन्यूला अर्जुनापासून दूर नेण्यासाठी एका साधारण सैनिकाला पाठवले. तो सैनिक युद्धासाठी अभिमन्यूला ललकारू लागला. तेव्हा अभिमन्यूला वाटले की हा साधारण सैनिक मला ललकारतो आहे म्हणून तो त्याचा पाठलाग करू लागला. तो सैनिक जेथे चक्रव्यूह रचला होता तेथे पोहोचला. तेथे कौरवांचे सर्व महारथी उपस्थित होते सर्वांनी मिळून अभिमन्यूवर आक्रमण केले व त्याला हालहाल करून ठार मारले. अशा प्रकारची घटना वर्तमान संगमयुगाची यादगार आहे. काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार हे मायावी ५ महावीर सकाळी-सकाळी युद्धासाठी येत नसतात. ते सर्वजण चक्रव्यूह रचून गुप्तपणे वार करण्यासाठी तयार बसलेले असतात. रोज सकाळी ते आळसरूपी साधारण सैनिकाला आपल्याकडे पाठवितात. आळस रूपी शत्रू आपला दोस्त बनून येतो. तो आपल्याला सांगतो, रात्री तुम्हाला डासांनी त्रास दिला त्यामुळे आता झोपा. आता नाही झोपलात तर ऑफिसमध्ये झोप येईल. तब्येत बिघडेल.

विनाशाच्या वेळी आपल्याला वैराग्य येईल तेव्हा आपण चांगला पुरुषार्थ करून, अवश्य विजयी बनू. आता तर साधन-सुविधांचा, मान-सन्मानाचा फायदा घेऊ या. ड्रामा तर 'बना बनाया' आहे. आपण इतके मोठे महारथी तर नाही. अशा प्रकारच्या व्यर्थ चिंतनाच्या गाढ निद्रेत ते झोपी जातात.

अमृतवेळेला आळसाबरोबर दोस्ती केली की मग बेपर्वाई व बहाणेबाजी हे दोघे सुद्धा आपल्याला परमात्मा पित्यापासून दूर घेऊन जातात. अमृतवेळा केली नसल्याने, आपण देहभानामध्ये येतो. तेव्हा आपण ५ विकारांनी रचलेल्या चक्रव्यूहात सापडतो. परिणामतः आपली संपूर्ण हार होते.

म्हणून वर्तमान समयी जो पुरुषार्थ करायचा आहे, त्यात जरा सुद्धा आळस करू नका. सदैव जागरूक (अलर्ट) तसेच क्रियाशील (ॲक्टीव) राहा म्हणजे तुमचे व्यक्तिमत्त्व इतरांसाठी आकर्षक (ॲट्रॅक्टिव्ह) बनेल. मातेश्वरी मम्मांच्या पुरुषार्थात जरासुद्धा आळस किंवा बेपर्वाई नव्हती. यज्ञात रोज दुपारी १२ वाजता भोग लावण्याचा नियम होता. त्यानुसार बरोबर १२ वाजता मम्मा भंडाऱ्यात येत. एक मिनिट सुद्धा त्यांना कधी उशीर होत नसे. बाबांनी त्यांना सांगितले होते की सत्ययुगी राज्य हे कायदा व सुव्यवस्था (Law & Order) यांच्यावर चालते. त्यानुसार मम्मांनी यज्ञ सांभाळला होता. आपणही मम्मांना फॉलो केले पाहिजे. तरच आपले लक्ष्य आपण गाठू शकू.

संगमयुगात सदा श्रीमतानुसार क्रियाशील (एक्टीव) राहणे आवश्यक आहे. जो थकला वा निष्क्रिय झाला तो संपला. जोपर्यंत जगायचे आहे तोपर्यंत ज्ञान, योग, धारणा व सेवा अवश्य करावयाची आहे. जरासुद्धा थकायचे नाही. पिताश्री ब्रह्माबाबांप्रमाणे अगदी शेवटच्या क्षणापर्यंत पुरुषार्थ करायचा आहे. सदैव उमंग-उत्साहाचे पंख लावून फरिश्त्याप्रमाणे उडायचे आहे. दररोज अमृतवेळेला रजाईचा त्याग करून, भविष्य २१ जन्मांकरिता राजाई प्राप्त करावयाची आहे. तात्पर्य म्हणजे अमृतवेळेला आपण जर आळसरूपी शत्रूला ओळखून, त्याला दूर केले तर दिवसभरात मायावी ५ विकाररूपी शत्रू आपल्याकडे बघणार सुद्धा नाहीत. उलट ते सर्वजण आपल्याला घाबरतील कारण रोज अमृतवेळेस प्राणनाथ शिवबाबा आपल्याला स्वमानाच्या स्मृतीचा तिलक, पवित्रतेचा मुकुट (ताज) तसेच दिलरूपी सिंहासन (तख्त) प्रदान करतात.

विज्ञानाच्या या युगात साधक हा साधन व सुविधांच्या गराड्यात आळस व बेपर्वाईच्या गाढ निद्रेत झोपला आहे. त्यामुळे मानसिक व शारीरिक रूपात खूप मोठे नुकसान होत आहे. साधन व सुविधा ह्या साधकाच्या साधनेला समाप्त करीत आहेत. विशेषतः अमृतवेळेच्या योगावर याचा परिणाम दिसून येतो. अमृतवेळेला आळस व बेपर्वाई यांचा प्रभाव मन-बुद्धीवर अधिक प्रमाणात पडतो. त्यामुळे जो साधक अमृतवेळेला आळसरूपी शत्रूला जिंकतो तो प्रभु मीलनाचा परमआनंद प्राप्त करून अमर बनतो. आळसाला जिंकण्यासाठी ईश्वरी महावाक्यांचे श्रवण, योग साधना, सकारात्मक चिंतन, कर्म योगाचा अभ्यास, दैनंदिन चार्ट या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

तसेच कधीही बहाणेबाजी करू नका कारण बहाणेबाजी करणारा जणू स्वतः च्याच भाग्याला लाथ मारत असतो. बहाणेबाजी करणारा खोटे बोलायला शिकतो. असा साधक कधीही स्वयं प्रिय, लोकप्रिय व प्रभुप्रिय बनू शकत नाही. तो दुसऱ्यांच्या हृदयाला जिंकू शकत नाही. परिणामतः तो भविष्यात राज्य अधिकारी देखील बनू शकत नाही. बहाणेबाजी करणारा समर्थ बनू शकत नाही.

यासाठी वर्तमान समयी आळस, बेपर्वाई (अलबेलापन) व बहाणेबाजी यांचा त्याग करून, तीव्र पुरुषार्थी बना. आपल्यात ज्या काही कमी-कमजोरी आहेत त्या या नवीन वर्षात २०१६ मध्ये काढून टाका व १६ कला संपूर्ण बना. सदैव लक्षात ठेवा की आपण विश्व परिवर्तनासाठी आधारमूर्त आत्मे आहोत, उद्धारमूर्त आहेत, मास्टर बीजरूप आहोत, पूर्वज व पूज्य आत्मे आहोत. आपण जर थकलो तर इतरांचे काय होईल? आपल्याला संगमयुगात अजूनही खूप कार्य करावयाचे आहे. परमात्म प्रत्यक्षता करायची आहे. अनेक भक्तांना त्यांच्या भक्तीचे फळ द्यायचे आहे. योगबळाने पुरुष (आत्मे) व प्रकृती यांना पावन सतोप्रधान बनवायचे आहे. सर्वांना स्थायी सुख व शांती प्रदान करावयाची आहे. म्हणूनच आपल्यातील आळस, बेपर्वाई व बहाणेबाजी यांना अंशसहित समाप्त करून, सदैव जागरूक (अलर्ट), क्रियाशील (ॲक्टीव) व आकर्षक (ॲट्रॅक्टीव) बनूया.

■■

जो साधक अमृतवेळेला आळसरूपी शत्रूला जिंकतो तो प्रभु मीलनाचा परमआनंद प्राप्त करून अमर बनतो. आळसाला जिंकण्यासाठी ईश्वरी महावाक्यांचे श्रवण, योग साधना, सकारात्मक चिंतन, कर्म योगाचा अभ्यास, दैनंदिन चार्ट या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.



शरीररूपी मंदिराला स्वच्छ ठेवा

शरीराची स्वच्छता अर्थात सदैव आपल्या शरीराला आत्म्याचे मंदिर समजून 'म्हणजे ही स्मृती ठेऊन, स्वच्छता करणे.' जितकी मूर्ती श्रेष्ठ असते तितकेच मंदिर देखील श्रेष्ठ असते. ब्रह्मावत्स वा ब्राह्मण तर साऱ्या कल्पात नंबर वन श्रेष्ठ आत्मे आहेत. ब्राह्मणांच्या तुलनेत देवतासुद्धा सोनेतुल्य आहेत आणि ब्राह्मण हिरेतुल्य आहेत. त्यामुळे आपण सर्व ब्रह्मावत्स हिऱ्यांच्या मूर्ती आहोत. किती महान आहोत! म्हणूनच इतका श्रेष्ठ स्वमान लक्षात ठेऊन, शरीररूपी मंदिराची स्वच्छता ठेवा. राहणी साधी असली तरी स्वच्छ असली पाहिजे. या विधीने केलेली स्वच्छता वा पवित्रता ही सदैव आत्मिक सुगंधाचा अनुभव करवील.

देहभान ठेऊन स्वच्छता होत नाही. परंतु शरीराला आत्म्याचे मंदिर समजल्याने स्वच्छता होते. तसेच हे मंदिर देखील शिवबाबांनी आपल्याला सांभाळण्यासाठी वा चालविण्यासाठी दिले आहे. **आपण या मंदिराचे ट्रस्टी (विश्वस्त) आहोत कारण आपण आपले तन-मन-धन शिवबाबांना दिले आहे. ते आता आपले नाही. अशाप्रकारची ट्रस्टीपणाची भावना आपल्याला नष्टमोहा बनवते अर्थात स्वच्छता व पवित्रता आपल्यात आणते.**

शरीराविषयीच्या मोहाने नव्हे तर शिवबाबांनी आपल्याला ही सेवा दिली आहे, असे समजून शरीराची स्वच्छता करा. अशा प्रकारची शरीराची स्वच्छता ही देखील आत्मिक सेवा आहे. तात्पर्य म्हणजे,

देह मंदिर, आत्मा मूर्ती,
हीच ठेवी भावना।
सत्य, शिव अन् सुंदराची,
नित्य करा हो साधना।।

■■



पाच युगांचा पाळणा

सत्ययुगाच्या पहिल्या दिवशी
सोळा कला संपूर्ण असशी
आठ जन्म आत्मा तू घेशी,
घराणे तुझे सूर्यवंशी
बाळकृष्ण हा आला जन्माशी
जो बाळा, जो जो रे जो ।।१।।

त्रेतायुगाच्या सुरुवातीला
राम–सीतेचा जन्म झाला
कमी हो झाल्या दोन कला
बारा जन्मांची ती शृंखला
रामराज्याचा गौरव झाला
जो बाळा, जो जो रे जो ।।२।।

द्वापर युगाचा काळ मग आला
देवता लागले वाम मार्गाला
एकवीस वेळा जन्म आपुला
सुरुवात झाली पूजे–अर्चेला
पूज्य आत्मा तो पुजारी झाला
जो बाळा, जो जो रे जो ।।३।।

कलियुगाच्या सुरुवातीला
पुजू लागले झाडा वडाला
बेचाळीस जन्म या युगाला
कलह क्लेश खूप वाढला
तेणे मानव दानव झाला
जो बाळा, जो जो रे जो ।।४।।

संगमयुगाची महिमा हो फार
धरतीवर आले शिव परमेश्वर
ब्रह्माबाबांच्या रथावर
ज्ञान अमृत दिले घरोघर
बदलला त्याने सारा संसार
जो बाळा, जो जो रे जो ।।५।।

- **ब्र.कु. प्रमिला बहेन,** कळमसरे (अमळनेर)



जसा संग तसा रंग

- ब्र.कु. दत्ताभाई, मालेगाव (नाशिक)

माझा जन्म अतिशय गरीब घरात झाला. माझ्या आई–वडिलांनी मोलमजुरी करून आम्हा तिघा भावंडांचे (दोन भाऊ व एक बहीण) पालन पोषण केले. बहीण मोठी झाल्यानंतर तिचे लग्न कुवतीप्रमाणे लावून दिले; परंतु दुर्दैव असे की एकाच वर्षात बहीण घरी आली. तिचा घटस्फोट झाला. त्यामुळे घरात सर्वजण अत्यंत दु:खी झाले. वडील पूर्वीपासून खूप भक्ती करायचे परंतु या घटनेने त्यांचा देवावरचा विश्वासच उडाला. त्यांनी भक्ती करणे सोडून दिले व ते सतत दु:खी, अशांत व निराश राहू लागले. त्यांची ही मनोदशा पाहून मी सुद्धा खूप दु:खी झालो. पुढे आमच्यावर लहानशा भाड्याच्या खोलीत राहाण्याची पाळी आली. परिस्थिती खूपच बिकट होत गेली. कधी कधी आम्हाला एक वेळ जेवण करून गुजारा करावा लागला. शिक्षण तर सुटलेच होते. मग दोन पैसे कमवता यावे म्हणून मी ड्रायव्हिंग शिकलो. कुणी बोलवल्यावर गाडीवर जाऊ लागलो. एकदाचा थोडे फार पैसे कमवायला लागलो. त्यात दुर्दैवाने मला वाईट संगत लागली. मित्रांच्या आग्रहास्तव, सगळ्या नको त्या सवयी लागल्या. अगदी वयाच्या १८व्या वर्षी मला दारू, तंबाखू, सिगारेट यांचे व्यसन लागले. रोज रात्री दारू पिऊन जेव्हा मी घरी येत असे तेव्हा मला खूप पश्चात्ताप व्हायचा. आपल्या घरी अशी ही गरीबी आणि आपण मात्र काय करतो आहोत? दारूच्या नशेत रात्री झोप जरी लागली तरी सकाळी ३ वाजता हमखास जाग यायची आणि मी ढसाढसा रडत बसायचो.

माझ्या अशा वागण्याने आई-वडिलांच्या दु:खात आणखीनच भर पडली त्यामुळे त्यांनाही मी नकोसा झालो होतो. घरातील सर्वजण माझा तिरस्कार करू लागले. परंतु माझे व्यसन मात्र कमी होत नव्हते. त्यामुळे बऱ्याचदा मनात आत्महत्येचे विचार येऊ लागले. अशातच एके दिवशी किरण नावाच्या व्यक्तीचा फोन आला की डॉ. कापडणीस यांची कार घेऊन, त्यांच्यासोबत बाहेरगावी जायचे आहे. त्याप्रमाणे मी त्यांच्यासोबत गेलो. माझे ड्रायव्हिंग त्यांना आवडल्याने त्यांच्याकडून पुन्हा-पुन्हा बोलवणे येऊ लागले. डॉक्टरांची एक सवय होती की ते प्रवासात शिवबाबांच्या गाण्यांच्या सी.डी. तसेच निरनिराळे क्लासेस कारमधील सीडी प्लेयरमध्ये लावत असत. त्यामुळे त्यातील ज्ञान माझ्या कानावर पडत असे. तसेच डॉक्टरसाहेब अधून–मधून मला थोडेफार ईश्वरी ज्ञान समजावून सांगायचे. अशा रीतीने माझ्या सुदैवाने मला चांगला संग लाभला होता.

परत एके दिवशी डॉक्टर साहेबांनी त्यांच्या हॉस्पिटलमधून मला फोन केला की आज आपल्याला माउंट आबू(राजस्थान) येथे जायचे आहे. त्याप्रमाणे आम्ही माउंट आबू येथे गेलो. डिसेंबर २०१३ ची घटना आहे. डॉक्टर साहेब त्यांच्या दिनचर्येत व्यस्त असत. मी मात्र गाडीतच बसून रहात असे किंवा बाहेर फिरत असे. मला एके दिवशी डॉक्टरांनी सांगितले की, तू आत डायमंड हॉलमध्ये जाऊन बस. म्हणून मी आत जाऊन बसलो. तेथील ब्रह्माबाबांच्या फोटोवर असलेल्या बिंदूरूप शिवबाबांचे मला खूप आकर्षण वाटले. त्यामुळे मी तेथील पुस्तके खरेदी केली व ती वाचत राहिलो. **त्यावेळी मला समजले की जर परमेश्वराकडे जायचे असेल तर आपल्याला पवित्र व निर्व्यसनी बनावे लागेल. त्यामुळे मी व्यसन सोडण्याचा विचार करू लागलो.** शांतिवनच्या पवित्र वातावरणात ४-५ दिवस कसे संपले हे सुद्धा मला कळले नाही. पण त्यानंतर मी खूप आनंदी राहू लागलो.

पुन्हा मार्च २०१५ मध्ये डॉक्टरांनी

मला माउंट आबूला जाण्यासाठी फोन केला. त्यावेळी डॉक्टरांना ग्लोबल हॉस्पिटल मध्ये १० दिवस सेवेसाठी सपरिवार बोलविण्यात आले होते. रोज सकाळी व संध्याकाळी सर्व जण योगासाठी पांडव भवन येथे जात असत. त्यावेळी मी मात्र बाहेरच बसून रहात असे. परंतु एकदा डॉक्टरांच्या लहान मुलाच्या आग्रहास्तव गाडी मागच्या गेटने पांडव भवनमध्ये न्यावी लागली. **त्यावेळी मी प्रथम पांडव भवन मध्ये गेलो. तेथील पवित्र वातावरणामुळे मी अक्षरश: भारावून गेलो आणि तेथेच मनातल्या मनात संकल्प केला की, तू खरंच परमपिता शिव परमात्मा असशील तर मला व्यसनांपासून मुक्त करशील. खरोखर आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेथून आल्यावर माझी सर्व व्यसने सुटली.** एवढेच नव्हे तर बाहेरचे खाणे–पिणेही सोडले. अधिकतर मी ज्ञानी लोकांकडे ड्रायव्हरचे काम करू लागलो आणि क्वचितच प्रसंगी इतरांबरोबर जावे लागले तर प्रवासाच्या दरम्यान मी केवळ नारळ पाणी पिऊन राहू लागलो. तात्पर्य म्हणजे माझ्या बुद्धीप्रमाणे मी ज्ञानात चालू लागलो होतो.

काही दिवसांनी नेत्रतज्ञ डॉ. मल्हार देशपांडे यांच्याकडून माउंट आबू येथे जाण्यासाठी मला फोन आला. त्यावेळी प्रवासाच्या दरम्यान त्यांनी देखील मला ईश्वरी ज्ञान दिले. परंतु घरी परत आल्यावर त्यांनी मोठ्या प्रेमाने मला सांगितले की दत्ता, तू ७ दिवसांचा कोर्स करून घे. म्हणजे तुझ्या सर्व शंकांचे निरसन होईल व ज्ञानदाता शिव परमात्म्याचा यथार्थ परिचय तुला प्राप्त होईल. मुख्य म्हणजे राजयोगाची विधी तुझ्या लक्षात येईल. त्याप्रमाणे मी सेंटरला रीतसर जाऊन सात दिवसांचा कोर्स केला व नियमितपणे सेंटरला जाऊन राजयोगाचा अभ्यास व मुरली क्लास अटेंड करू लागलो.

त्यानंतर माझ्या आयुष्यात आमूलाग्र बदल होत गेला. भोलेनाथ शिवबाबांनी माझ्या जीवनातील सर्व दु:ख दूर करून मला सुखमय जीवनाचे वरदान दिले. रोज सेंटरला गेल्यावर जी सेवा मिळेल ती मोठ्या आनंदाने मी करू लागलो. मूलत: माझा स्वभाव, शांत, मनमिळाऊ व आज्ञाधारक असल्याने थोड्याच कालावधीत मी ब्राह्मण परिवाराचा लाडका बनलो. आता अशी परिस्थिती आहे की दर ३/४ महिन्यात मला कोणत्या ना कोणत्या ईश्वरी परिवारातील भाऊ-बहिणींसोबत शिवबाबांच्या घरी मधुबनला जायला मिळते. पवित्र ब्रह्मावत्सांचा सहवास लाभतो. त्यांच्या संगतीत राहून अनेक दिव्य गुणांची धारणा झाली. जवळ-जवळ रोज शिवबाबा मला सेवेची संधी देतात. त्यामुळे सेवेच्या बळामुळे व संपूर्ण ब्राह्मण परिवाराच्या आशीर्वादाने मी तीव्र पुरुषार्थात उडत आहे. पूर्वीचा दु:खी चेहरा, भीजलेले डोळे आज हर्षित चेहऱ्यात परिवर्तन झाले आहे. डोळ्यात परमात्म प्रेमाची झलक व फलक इतरांना बघायला मिळते. पूर्वी आजूबाजूचे लोक माझ्या रोजच्या भांडणानी परेशान झाले होते. तेही ब्रह्माकुमारीज् सेंटरची प्रशंसा करायला लागले. आई-वडीलही माझ्यावर खूप-खूप खूष आहेत. त्यांना नकोसा वाटणारा मी आज हवा-हवासा वाटतो. माझ्याकडे पाहून वडिलांचेसुद्धा तंबाखूचे व्यसन सुटले. बहिणीचेही दुसरे लग्न झाले. आता तिच्या संसारात तीही सुखी आहे. आई-वडिलांनाही मधुबन दाखवून आणले. आईला मजुरी करण्यापासून परावृत्त केले. ते दोघेही सेंटरला येतात. मला पूर्वी अजिबात लिहिता-वाचता येत नव्हते. पण मला शिवबाबांनी लिहायला-वाचायला शिकविले. मी रोज मुरली लिहितो. तसेच ज्ञानाचे पुस्तक वाचतो.

ज्ञान घेतल्यापासून माझे आंतरिक परिवर्तन सुरू झाले. आत्म्यांचे ज्ञान व परमपित्याची ओळख झाली. दोन पित्यांच्या परिचयामुळे हा संपूर्ण निश्चय झाला की शिवबाबाच माझे अविनाशी पिता आहेत. तसेच कर्माच्या गुह्यगतीचे ज्ञान मिळाल्यानंतर आतापर्यंत जीवनात आलेल्या कठीण प्रसंगांचा उलगडा झाला. व आहे त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी खंबीर मन तयार झाले. शिवबाबांची अलौकिक शक्तिही सोबत असतेच. रोज सकाळी अमृतवेळेला ३.३० वाजता उठून नियमित योगाभ्यास व ज्ञानमुरलीचे श्रवण यामुळे परिवर्तन होण्यास मदत झाली. **गाडी चालवित असतांनाही मी मा. विघ्नविनाशक आत्मा आहे हा स्वमान धारण करतो व निश्चिंत होऊन बाबांची सेवा करतो. खरं तर बाबा माझ्याकडून सेवा करवून घेतात. आता तर मन हेच गीत गाते ''पाना था सो पा लिया, पाने का ना कुछ रहा'' आता माझे तन-मन-धन मी प्राणेश्वर शिवबाबांच्या सेवेत समर्पित केले आहे.**

परमप्रिय शिवबाबा ज्यांनी माझ्या सारख्या भटकणाऱ्याला योग्य वेळी योग्य मार्ग दाखविला व मार्गदर्शक बनून प्रत्येक पावलावर साथ देत आहेत. मधुबन, मधुबनचे बाबा व मुरली या तीन गोष्टी मला अत्यंत प्रिय आहेत. त्यामुळे माझ्या हृदयात सदैव हेच गीत गुंजत असते,

''ओ मधुबन वाले बाबा,
ओ मीठे प्यारे बाबा।
तूने प्यार जो दिया है
भला कैसे भुलाये।।''

■■